॥ जय माता जी ॥

॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : १ | सोमवार दि. २८ डिसेंबर २०२० ते रविवार दि. ३ जानेवारी २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


# अन्नदात्याचा प्रहार सरकारला भारी पडणार शेतकरी आंदोलनाचा देशभर भडका उडणार

दिल्ली/लक्ष्मणराव पाटोळे

केंद्राच्या नव्या कृषी कायद्याच्या विरोधात शेतकऱ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाचा आता देशभर वणवा पसरत चालला आहे. प्रत्येक राज्यातील शेतकरी असो कि कामगार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहत आहे आणि त्यामुळेच गेल्या महिनाभरापासून दिल्लीच्या वेगवेगळ्या सीमांवर कडाक्याच्या थंडीत पंजाब, हरयाणा आणि देशाच्या इतर भागातून आलेला शेतकरी ठाण मांडून बसला आहे. जोपर्यंत शेतकरी विरोधी काळा कायदा सरकार रद्द करीत नाही, तोवर आम्ही येथून हटणार नाही! असा शेतकऱ्यांचा निर्धार आहे. तर सरकार कृषी कायदा रद्द करायला तयार नाही. मोदींच्या भाषणातून हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकरी विरुद्ध सरकार असा संघर्ष अटळ आहे. दरम्यान पंजाब आणि हरयाणा हि दोन राज्य गहू आणि तांदळाची कोठारे म्हणून ओळखली जात असल्याने आणि शेतकरी शेती सोडून आंदोलनाला बसलेले असल्याने पुढच्या वर्षी देशात अन्नधान्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे आणि तसे झाले तर देशातील जनतेवर उपासमारीची पाळी येईल. महागाई प्रचंड वाढेल आणि याला सर्वस्वी मोदी सरकार जबाबदार असेल, असे देशवासीयांचे म्हणणे आहे म्हणूनच सरकारने माघार घेऊन हा काळा कायदा रद्द करावा आणि शेतकऱ्यांचे आंदोलन संपवा अशी मागणी देशवासी करीत आहेत. ...पान २ वर

## वहिनीच्या हत्येची सुपारी देऊन फसला गेम होण्यापूर्वीच तुरुंगात जाऊन बसला

मुंबई/राजेंद्र वेदांते

संपतीचा वाद रक्ताची नाती विसरायला लावतो आणि एकदा का माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण झाली कि मग तो सूड घेतल्याशिवाय शांत बसत नाही. २०१३ मध्ये मटका किंग सुरेश भगत याची त्याच्या पत्नीनेच हत्या घडवून आणली आणि मटका बाजारावर कब्जा केला. त्यामुळे चिडलेल्या सुरेश भगतच्या भावाने आपल्या वाहिनीवर सूड घेण्यासाठी तिची आणि तिच्या बहिणीच्या हत्येची सुपारी दिली. पण त्या दोघींचा गेम होण्यापूर्वीच पोलिसांना या कटाचा सुगावा लागला आणि वाहिनीची व तिच्या बहिणीच्या हत्येची ६० लाखांची सुपारी देणाऱ्या विनोद भगतसह त्याच्यासाठीदारांनाही अटक करण्यात आली.

माणसाला जगण्यासाठी किती पैसा लागतो? हा प्रश्न जरा बुचकळ्यात टाकणारा आहे. कारण प्रत्येक माणसाची पैशाची भूक कधीच भागत नाही. पैसा सर्व श्रेष्ठ मानणार्यांची संख्या अधिक आहे. यामध्ये नवकोट नारायण सुद्धा फिके पडतात.पैसा कमवण्याचे युद्ध फार भयंकर असते. यात कोण कुणाचे नसते. कितीही जवळचा, जिवाभावाचा, रक्ताच्या नात्यातला असला तरी त्याचा (खून केला जातो) बळी दिला जातो. मुंबईतील प्रख्यात मटका किंग सुरेश भगत कुटुंबियांची हि रक्तरंजित कथा आपल्या समोर मांडत आहे.यात जवळच्या नात्यातील लोक कसा एकमेकांचा काटा काढतात हे समोर आले आहे. परंतु यात पोलीसांनी महत्त्वाची भूमिका पार पाडून दोघांचे मुडदे पडण्यापूर्वीच यातील मारेकर्यांविरूद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. पोलीसांनी दाखवलेल्या तत्परते मुळे दोन महिलांची हत्या होता होता वाचली. असाही गुन्हा घडल्यानंतर पोलीस येतात असा आरोप पोलीसांवर नेहमी केला जातो परंतु या गुन्ह्यात पोलीसांनी गुन्हेगारांच्या वेळीच मुसक्या आवळून त्यांना पोलीस कोठडीत टाकले. एखाद्या चित्रपटाच्या कथेला शोभेल असा कट मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रांचने उधळला आहे. क्राइम ब्रांचने दाखवलेल्या सतर्कतेमुळे जया भगत आणि आशा या दोन महिलांच्या हत्येचा ...पान २ वर

## लुटमार करणाऱ्याचे डोकेच फिरले साक्षीदार मुलाला गळा दाबून मारले

कोर्टात नेताना आरोपी

मयत रामजीचे शोकाकुल वडील

नाशिक/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही गुन्ह्यात जर एखादा साक्षीदार असेल तर त्याच्यामुळे गुन्हेगार सहजपणे पोलिसांना सापडतो. म्हणूनच गुन्हेगार सहसा साक्षीदाराला जिवंत ठेवत नाहीत. एकतर धमकी देऊन त्याला गप्प बसवतात किंवा त्याला कायमचे संपवतात. भाजीपाला आणि किरण मालाची वाहतूक करणाऱ्या एका ओमनी चालकाने रस्त्यात एका प्रवाशाला लिफ्ट दिली आणि चाकूचा धाक दाखवून मारहाण करून लुटले. मात्र हि घटना त्या ओमनी मध्ये असलेल्या लहान मुलाने पाहिली आणि आपण हा घडलेला प्रकार सर्वांना सांगू असे टेंपो चालकाला सांगताच घाबरलेल्या ओमनी चालकाने त्या मुलाची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

सिंघवापुर जि. बलरामपुर (उत्तर प्रदेश) येथील मुळ रहिवासी असलेला लालबाबू यादव हा व्यवसायाच्या निमित्ताने नाशिक रोड परिसरात परिवारासह राहण्यास आला आहे. नाशिक रोड भागातील सासनगव रस्त्यावरील गाडेकर मळ्यात तो भाड्याने खोली घेवून हा परिवार राहू लागला. मोलमजुरी करुन ते आपल्या कुटूंबाचे पालनपोषण करतात. लालबाबू यांना दोन अपत्ये होती....पान २ वर

## दारू पिऊन आलेल्यांना त्यांनी हटकले मुख्याध्यापकाला ठार मारून सटकले

मयत किशोर

जळगाव/क्राईम रिपोर्टर

आजकाल कोणाला चांगल्या दोन गोष्टी सांगण्याचे दिवस राहिलेले नाहीत. कारण समोरच्याला पटकन राग येतो आणि मग तो चांगल सांगणाऱ्या माणसाच्याच जीवावर उठतो. म्हणूनच चांगल्या माणसाने सहसा कुणाच्या आणि खास करून दारुड्या लोकांच्या भानगडीत पडू नये. एका मुख्याध्यापकाने दोन दारूड्यांना दारू का प्यायलात असे म्हणून हटकताच ते दारुडे इतके चिडले कि दोघांनी त्या मुख्याध्यापकाला ठार मारले आणि फरारी झाले. मात्र पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोन्ही आरोपींना अटक केली.

देशाची भावी पिढी घडवण्याचे काम शिक्षक करत असतो. आजची निरागस मुले उद्याचे नागरीक असतात. त्या नागरीकांना घडवण्याचे मोठे काम शिक्षक वर्गावर असते. एका आदर्श शिक्षकाचा दोघा मद्यपी तरुणांनी खून केल्याची घटना जळगाव जिल्ह्याच्या एरंडोल या तालुक्याच्या ठिकाणी घडल्यामुळे विद्यादानाच्या क्षेत्रात मोठी खळबळ माजली होती. या हत्येमागचे नेमके कारण काय असावे याचा उलगडा जोवर होत नव्हता तोपर्यंत चर्चेला विविध प्रकारचे उधान आले होते. विविध तर्क वितर्क लावण्यात येत होते. मात्र दोघा मद्यपींनी केवळ दारुच्या नशेत झालेल्या झटापटीत शिक्षकाची हत्या केल्याचे पोलिस तपासात अखेर उघड झाले. मात्र एका आदर्श शिक्षकाची हत्या होणे ही खरोखरच एक ...पान २ वर

## अनैतिक संबंध त्याला सहन नाही झाले बारबालेला तिच्या प्रियकराने ठार केले

मयत रिना शेख

नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

बारबाला म्हटली कि तिचे ग्राहकांशी संबंध येतातच. कारण तिला पैसा हवा असतो आणि बारमध्ये अंगप्रदर्शन करून ग्राहकांना पटवून त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेऊन बहुतेक बारबाला पैसे कमावत असतात. मात्र अशा बारबालांचे जे प्रियकर असतात त्यांना मात्र आपली प्रेयसी धंदा करते हे आवडत नसते. अशाच एका बारबालेच्या प्रियकराने बारबालेला ठार मारून बंगलादेशात पळून गेला होता. पण पोलिसांनी त्याचा शोध घेत मुंब्रा येथून त्याच्या मुसक्या आवळल्या.

रीना ही आपल्या दोन मैत्रिणींसोबत कळंबोली येथील एका फ्लॅटमध्ये राहत होती. तिच्या दोन्ही मैत्रिणीही बांगलादेशी होत्या. सर्व काही ठिकठाक चालू असताना एक दिवस रिनाची निर्घणपणे हत्या झाली. या हत्येमुळे कळंबोली भागात खळबळ माजली होती. पोलीस यंत्रणेने या गुन्ह्याची गंभीर दखल घेत तपासाला सुरुवात केली. सुरुवातीला तपासाचा कोणत्याही धागाधोरा ...पान २ वर

## छेडछाडीच्या प्रकरणात मध्यस्थी करायला गेला सराईत गुंडाच्या हातून बिचारा समाजसेवक मेला

बेळगाव/क्राईम रिपोर्टर

समाजसेवक म्हणून सामाजिक क्षेत्रात वावरणाऱ्या माणसावर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा राग असतो. कारण सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे समाजातील वादविवाद मिटवणारे समाजसेवक हे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या मार्गातील काटे असतात आणि कधीना कधी हे काटे त्यांना टोचलेले असतात, म्हणूनच त्यांना मार्गातून हटवण्यासाठी ते सतत काही ना काही षड्यंत्र रचत असतात. बेळगावच्या आंबेडकर गल्लीत राहणाऱ्या आणि नेहमीच सामाजिक कार्यात तसेच लोकांचे वाद मिटवण्यात मध्यस्थी करणाऱ्या जयपाल गारांनी यांच्यावर त्याच भागात राहणाऱ्या ज्योतीराजचा राग होता. कारण एका मुलीच्या छेडछाडीच्या प्रकरणात ज्योतीराजला त्यांनी मारले होते आणि याच रागातून ज्योतीराजने एक दिवशी जयपालची हत्या केली. मात्र काही तासातच पोलिसांनी त्याला अटक केली.

मयत जयपाल

जुने बेळगाव शहरातील अंबडेकर गल्लीत जयपाल गराणी हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. ते एका खाजगी चार चाकी गाडीवरती चालक म्हणून काम करतात. तसे ते साध्या सरळ स्वभावाचे होते. त्याचा प्रामाणिकपणाचा पिंड होते. एखादयाला मदत करायला ही ते तत्पर असत. तसेच गल्लीत कुणाचे काही भांडण झाले तर ते पुढे होऊन भांडणात मध्यस्थी करत भांडण मिटवत होते. त्याना ...पान ६ वर

## प्रेयसीला ठार मारून फरारी झाला लिव्ह इन मधला सुतार कसाई निघाला

मुंबई/क्राईम रिपोर्टर

लिव्ह-इन-रिलेशनशिपचे नाते हे अळवावरच्या पाण्याच्या थेंबा सारखे असते. कारण जोवर पुरुषाला स्त्रीमध्ये आणि त्या स्त्रीला तिच्या लिव्ह इन मधल्या जोडीदारामध्ये आकर्षण असते, तोवर असे नाते टिकून राहते. मात्र एकदा का आकर्षण संपले कि मग दोघेही कधीही वेगळे होऊ शकतात आणि बऱ्याच ठिकाणी लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या जोडप्यांमध्ये असेच घडले आहे. पण वरळीत मात्र एका सुताराने लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या त्याच्या घटस्फोटीत प्रेयसीची गळा दाबून हत्या केली. इतकेच नाही तर तिच्या चेहऱ्यावर वारही केले. या प्रकरणी पोलीस फरारी सुताराचा शोध घेत आहेत.

मुंबईतील वरळी परिसरात राहणाऱ्या एका ४४ वर्षीय महिलेची तिच्या प्रियकराने हत्या केली. प्रियकराने ओढणीने गळा आवळून तिचा खून केला. यानंतर आरोपीने तिच्या चेहऱ्यावर धारदार चाकून वार करत तिचा चेहराही बिघडवला. सीखा मंडल असं या मृत महिलेचं नाव आहे. पतीसोबत घटस्फोट घेतल्यानंतर ही महिला शिबू भौमिक नावाच्या व्यक्तीसोबत अनेक वर्षापासून लिव्ह इन रिलेशनशिप राहत होती. वरळीतील मायानगर परिसरात या ...पान २ वर

## यारामुळेच आयुष्याची दोरी तुटली विधवेच्या खुनाला अखेर वाचा फुटली

भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडीमध्ये एका विधवा महिलेची काही दिवसांपूर्वी हत्या करण्यात आली होती. त्या हत्या प्रकरणाचा आता उलगडा झाला असून सदर हत्या अनैतिक संबंधातून सुरु असलेल्या ब्लॅकमेलिंगमुळेच झाल्याचे आता उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे मृतक महिला हि तिच्या रिटायर प्रियकराला ब्लॅकमेल करून त्याच्याकडून पैसे उकलीत होती. अखेर कंटाळून तिच्या प्रियकरानेच तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली आहे.

ब्युटी पार्लरचा व्यवसाय करणाऱ्या विधवा महिलेची तिच्या राहत्या घराच कोणी नसताना पाच दिवसापूर्वी अज्ञात मारेकऱ्याने धारधार शस्त्राने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. हि घटना भिवंडी शहरातील तीनबत्ती परिसरात असलेल्या हाफसनआळी परिसरात असलेल्या एका ...पान २ वर

## भलतेच करून ती निस्सीम प्रेमाला जागली विकृत प्रियकरामुळे प्रेयसीची वाट लागली

विकृत प्रभू

बंगळूर/क्राईम रिपोर्टर

वासनेने वखवखलेला माणूस हळू हळू विकृतीकडे झुकू लागतो आणि आपली हि विकृती शांत करण्यासाठी तो कधी कधी आपल्या जवळच्या माणसालाच आपल्या हातचे बाहुले बनवतो आणि त्याच्या मदतीने आपली विकृत वासना शमवतो प्रभू नावाच्या एका विकृत आचार्याने लेडीज होस्टेलमधील मुलींचे नग्न फोटो आणि अश्लील व्हिडिओ काढण्यासाठी आपल्याच नर्स असलेल्या प्रेयसीचा वापर केला. मात्र एके दिवशी ती पकडली जाताच त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र त्याची ती विकृती पाहून पोलीस हि हादरून गेले.

२५ वर्षीय आश्विनी देखणी आणि सुंदर, मादक होती. गेल्या काही वर्षापूर्वी तिचे लग्न झालेले होते. परंतू तिचे तिच्या नवऱ्याशी फारसे पटत नसल्याने त्या दोघांचा लवकरच घटस्फोट झालेला होता. ती आता बिनधास्त वागत होती. तशी ती मॉर्डन आणि सेक्सी वागत असल्याने अनेक तरूण तिच्या मागे लाळ घोळू लागले होते. तिची मादक आणि सेक्सी जवानी बघून कधी एकदा ...पान ६ वर

## गुन्हा लपवण्यासाठी त्याच्याकडून भलतेच घडून गेले तेरा वर्षांच्या मुलाने सहा वर्षांच्या मित्राला ठार केले

दुर्दैवी मोहित

धुळे/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही माणसाच्या हातून गुन्हा घडला कि त्याच्या मनात पोलिसांची भीती निर्माण होते. त्यामुळे तो गुन्हा लपवण्यासाठी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. जर एखाद्या नराधमाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला, तर तिने ती गोष्ट इतरांना सांगू नये व त्यातून आपल्याला अटक होऊ नये म्हणून तो बलात्कारी त्या मुलीचे तोंड बंद करण्यासाठी तिची हत्या करतो आणि आपला गुन्हा लपवण्याचा प्रयत्न करतो. पण आजकाल केवळ मोठी माणसेच गुन्हा करून तो अशाप्रकारे लपवतात असे नाही, तर छोटी मुलेही एखादा गुन्हा करून तो लपवण्यासाठी दुसरा गंभीर गुन्हा करतात. असाच प्रकार धुळे जिल्ह्यातील अंतुर्ली गावात घडला. एका तेरा वर्षांच्या मुलाने त्याच्या सहा वर्षांच्या मित्र सोबत झालेल्या भांडणात मित्राचे डोके फोडले. मात्र त्याचे डोके फोडल्याने आपल्याला पोलीस पकडतील अशी भीती त्याच्या मनात निर्माण झाल्याने त्याने आपल्या त्या जखमी मित्राचे कायमचे तोंड बंद करण्यासाठी त्याची दगडाने ठेचून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

धुळे येथील जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात नवी अंतुर्ली गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील १३ वर्षीय मुलाने सहा वर्षे (६) मुलाची दगडाने ठेचून हत्या केल्याचा प्रकार समोर आल्याने गावात खळबळ उडाली आहे. नवी अंतुर्ली गावातील मोहित दिनेश ...पान ६ वर

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:11 PM Page 1



## पान १ वरून....

### अन्नदात्याचा प्रहार सरकारला भारी...

सरकारने हा कायदा अंबानी-अदाणी यासारख्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी केलेला आहे आणि कृषी क्षेत्रात कॉर्पोरेट जगताला सरळ घुसखोरी करण्याचा मार्ग मोकळा करून देऊन शेतकऱ्यांच्या जमिनी उद्योगपतींच्या घशात घालण्याचा हा डाव आहे आणि सरकारच्या याच धोरणाला देशातील ६३ कोटी शेतकऱ्यांचा विरोध आहे. त्यातच इलेक्ट्रॉनिक्स मीडियातील दलाल पत्रकार शेतकऱ्यांना खलिस्तानी, पाकिस्तानी दहशतवादी असे संबोधून बदनाम करीत असल्याने शेतकऱ्यांच्या संतापाचा कधीही स्फोट होऊन भयंकर राडा होऊ शकतो. तसे झाले तर संपूर्ण देशात रक्तरंजित कृषी क्रांती होऊन त्यात फाळणीच्या वेळेसारखी स्फोटक परिस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याची भीती अनेकांनी व्यक्त केली आहे. संसदेच्या मागील अधिवेशनात मोदी सरकारने शेतकरी किंवा त्यांच्या संघटनांशी चर्चा न करता तीन कृषी विधायाके पास करून घेतली होती. यात शेतकरी उत्पादने, व्यापार व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा कायदा यात शेतकऱ्यांना त्यांचा माल त्यांच्या इच्छेनुसार कुठेही विकत येणार आहे, पण त्यामुळे एपीएमसीचे अस्तित्वच धोक्यात येणार आहे. कारण कृषी उत्पन मालाच्या विक्रीची एक सिस्टीम आहे. तिला तडा गेल्यास या सिस्टीममध्ये काम करणाऱ्या लाखो लोकांचे काय? ज्यात कृषी मालाचे व्यापारी, आडत्या, वाहतूकदार तसेच हमाल यांचे काय? शिवाय किमान आधारभूत किमतीची यंत्रणाच यामुळे मोडकळीस येईल. दुसरे विधेयक शेतकरी सशक्तीकरण आणि संरक्षण हा कायदा! हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल असून याच कायद्याच्या माध्यमातून अदाणी-अंबानी सारख्या बड्या उद्योजकांची कृषी क्षेत्रात घुसखोरी होणार असल्याने शेतकऱ्यांचा त्याला विरोध आहे. या कायद्यात शेतकऱ्यांना ते घेत असलेल्या पिकासाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतूद आहे. आपल्या पिकासाठी घाऊक विक्रेते प्रोसेसिंग इंडस्ट्रीज किंवा कंपन्यांशी करार करता येईल. पण कंत्राटी व्यवस्थेत शेतकरी सक्षमपणे वाटाघाटी केरू शकतील का? त्याच बरोबर अनेक लहान लहान शेतकऱ्यांशी करार करण्यात बड्या कंपन्या इंट्रेस्ट दाखवतील का? त्याच बरोबर कंपन्यांशी करार केल्यानंतर जर नैसर्गिक आपत्तीत शेतमालाचे नुकसान झाले तर पुढे काय? असे अनेक प्रश्न आहेत आणि अशा करारांमध्ये नुकसान झाल्यास ज्या कंपनीशी करार झालाय ती कंपनी आपले नुकसान भरून काढण्यासाठी त्या शेतकऱ्याच्या शेतीवर कब्जा करू शकते. बरे या बाबत शेतकऱ्याला न्यायालयात जाण्याचा सुद्धा अधिकार नाही. केवळ जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या कक्षेपुरताच हा वाद मर्यादित राहू शकतो. त्यामुळे या कायद्याच्या माध्यमातून कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करू शकतात अशी भीती शेतकऱ्यांना आहे आणि ती रास्त आहे. सरकारने कोरोना काळात घाईघाईने हि तीन विधेयके उद्योगपतींच्या फायद्यासाठी मंजूर करून घेतली असा जो शेतकऱ्यांचा आक्षेप आहे तो रास्त आहे. म्हणूनच हा कायदा रद्द करण्याची शेतकरी मागणी करीत आहेत. तर सरकार मात्र कायदा रद्द करायला तयार नाही. पण सरकारने दिल्लीच्या सीमेवर बसलेल्या शेतकऱ्यांना जबरदस्तीने उठवण्याचा प्रयत्न केला, तर पोलीस आणि शेतकरी यांच्यात राडा होऊन भयंकर रक्तपात घडू शकतो. कारण आजवर शेतकऱ्यांना हटवण्यासाठी थंड पाण्याचे फवारे मारण्यात आले, काही ठिकाणी लाठीचार्ज केला. पण शेतकरी हटले नाहीत आणि हटणारही नाहीत. आम्ही सहा महिन्याचे रेशनपाणी घेऊन इथे बसलोत. त्यामुळे मागे हटणार नाही असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या महिनाभराच्या काळात सरकार बरोबर शेतकऱ्यांच्या ६ बैठका झाल्या, पण सरकार कृषी कायदा रद्द करायला तयार नाही. त्यामुळे शेतकरी सुद्धा मागे हटत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा शेतकरी आंदोलनाबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे, तर विरोधी पक्षांनी राष्ट्रपतींची भेट घेऊन त्यांना दोन कोटी सह्यांचे निवेदन दिले आहे. आता हे आंदोलानात एक राष्ट्रीय आंदोलन बनलेले आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मीडियातील मोदींच्या दलालांनी कितीजरी कोल्हेकुई केली किंवा शेतकऱ्यांची बदनामी केली तरी शेतकरीही आता पेटून उठलाय. त्यामुळे कृषी कायदा रद्द करण्याखेरीज सरकारसमोर पर्याय नाही. कारण शेतकरी आता उद्योगपतींच्या व्यवसायांना टार्गेट करीत आहेत. जिओचे लाखो सीम, वोडाफोन एअरटेलमध्ये पोर्टेबल करण्यात आले. अंबानीच्या पेट्रोल पंपांवर बहिष्कार टाकण्यात आलाय. जीयोच्या टॉवरवर हल्ले सुरु झालेत. हे आंदोलन आता उग्र रूप धारण करीत असून संपूर्ण देशात त्याचा वानवा भडकल्यास भाजपा नेत्यांना घराबाहेर पडणे मुश्कील होईल आणि देशात स्फोटक परिस्थिती निर्माण होईल.

### लुटमार करणाऱ्याचे डोकेच फिरले...

एक मुलगा व एक मुलगी आणि दोघे पती पत्नी असा चौकोनी परिवार त्यांचा होता. मोठा मुलगा रामजी लालबाबू यादव हा नऊ वर्षाचा बालक तिसरीच्या वर्गात शिकत होता. कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी शाळा बंद असल्यामुळे तो घरीच होता. चिमुकला रामजी परिसरात खेळत असे अथवा शेजारी पाजारी जात असे. निरागस रामजीचे सर्वच जण लाड करत होते. कोणत्याही तरुणासोबत जावून तो फिरुन येत असे. गाडेकर मळ्यात भाड्याच्या जवळपास दहा ते बारा खोल्या आहेत. लालबाबू यादव यांच्यासह इतरही भाडेकरी या चाळीत राहतात. त्यांच्या शेजारीच विशाल विष्णू गेजगे (२४) हा तरुण त्याच्या परिवारासह राहतो. विशाल याची आई टिळक पथवर भाजीपाला विक्री करते. आपल्या घरमालकाच्या ओमनी कारने तो आपल्या आईला घरुन भाजीपाला नेवून देण्याचे काम करतो. शिवाय नाशिक रोड भागात असलेल्या मालकाच्या किराणा दुकानासाठी त्यांच्या ओमनी कारने किराना माल आणून देण्याचे काम देखील तो करतो. कधी कधी तो शेजारी राहणाऱ्या रामजीला देखील सोबत फिरायला घेवून जात असे. विशाल हा गुन्हेगारी वृत्तीचा तरुण आहे. तो कधी काय गुन्हा करेल याचा काही भरवसा रहात नव्हता. मंगळवार १ नोव्हेंबर रोजी दुपारी तिन वाजेच्या सुमारास त्याच्या घरमालकाने त्याला बोलावले. त्यांच्या नाशिक रोड येथील किराणा दुकानातील तेलाचे डबे आणण्यासाठी स्वत:ची ओमनी कार त्यांनी विशाल यास दिली. त्यानंतर आपण तिकडेच जात आहोत म्हणून त्याने आपल्या घरातील भाजीपाला आईला पोहोचवून देण्यासाठी कारमधे भरला. यावेळी कारजवळ रामजी आला. त्याने रामजी यास देखील कारमधे बसवून घेतले. यासोबत विशाल याने त्याचा मित्र स्वप्नील याला देखील कारमधे बसवून घेतले. भाजीपाल्यासह रामजी व स्वप्नील यांना घेवून विशाल कारने टिळक पथवरील दिव्या कलेक्शनजवळ भाजीपाला विक्री करणारी त्याची आई वंदना गेजगे हिच्याकडे आला. काही भाजीपाला आईला देवून तो कारमधीला आणखी भाजीपाला घेवून मिना बाजार, देवळाली गाव, जेलरोड या ठिकाणी येवून त्याने भाजीपाला विक्री केला. यात बरीच रात्र झाली. रात्री सव्वा आठ वाजेच्या सुमारास घरी जाण्यापुर्वी विशाल व स्वप्नील या दोघा मित्रांनी मद्यप्राशन केले. त्यानंतर रामजीसह दोघे मित्र सिन्नर फाट्याच्या दिशेने जात असतांना त्यांना वाटेत उड्डाणपुलाखाली विजय आव्हाड या प्रवाशाने त्यांना हात दाखवून लिफ्ट मागीतली. विजय आव्हाड या प्रवाशाला सिन्नर येथे जायचे होते. विशाल सिन्नरकडे जात नसतांना देखील त्याने प्रवाशी विजय यास कारमधे बसवून घेतले. विशाल व स्वप्नील या दोघांनी सामनगाव रस्त्याने कोटमगाव गाठले. त्याचवेळी प्रवासी विजय आव्हाड याच्या मनात शंका आली. गाडी या रस्त्याने का टाकली असा प्रश्न प्रवाशी विजय आव्हाड याने वाहनचालक विशाल गेजगे यास केला. त्यावर त्याने म्हटले की वाटेत मामाकडे भाजीपाला देवून पुढे सिन्नरला जावू. मात्र विशाल व त्याचा मित्र स्वप्नील या दोघांच्या मनात वेगळाच डाव सुरु होता. त्याचा थांगपत्ता प्रवाशाच्या रुपातील विजय आव्हाड यास लागला नाही. कोटमगाव कडून हिंगणवेढे गावाच्या अलीकडे निर्मनुष्य ठिकाणी हॉटेल राधिकाच्या पुढे विशालने गाडी उभी केली. स्वप्नीलने विशालच्या मदतीने प्रवासी विजय याच्यावर चाकूहल्ला करत त्याला जखमी केले. विजयच्या खिशातील अकरा हजार रुपये किमतीचा मोबाईल व चार हजार रुपये लुटून त्याला गाडीखाली फेकून दिले. त्यानंतर त्यांनी तेथून पळून जाण्याचे काम केले. हा लुटीचा सर्व प्रकार गाडीत बसलेल्या चिमुकल्या रामजीने पाहिला होता. विजय आव्हाड या प्रवाशाला लुटल्यानंतर विशाल लाखलगाव मार्गे हॉटेल मिर्ची, जेलरोड येथून नाशिक रोड येथे आला. याठिकाणी त्याने मित्र स्वप्नील यास घरी जाण्यासाठी गाडीतून उतरवून दिले. पुढे सिन्नरच्या दिशेने जात असतांना गाडीत बसलेला चिमुकला रामजी विशालला म्हणाला की, तुमने उस आदमी को चाकू लगा के मोबाईल और पैसा निकाला, ऐसा क्यूं किया? मैं सब बता दूंगा. त्याचे हे बोलणे ऐकताच विशाल त्याच्यावर चिडला. रामजीमुळे आपल्या लुटमारीचे बिंग फुटेल अशी त्याला भीती वाटू लागल्याने विशालने रामजीचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. आपण केलेल्या लुटीची माहिती रामजी आपल्या घरी सांगणार म्हटल्याने याचा कसा बंदोबस्त करायचा याचे विचारचक्र त्याच्या डोक्यात झाले. नायगाव रोडने जातांना रस्त्यातच थांबून विशालने अतिशय कृरपणे व निर्दयीपणे गाडीतील टॉवेलने चिमुकल्या रामजीचा जोरात गळा आवळून त्याचा खून केला. बिचाऱ्या रामजीने हात-पाय झटकतच जीव सोडला. त्यानंतर त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी सिन्नर तालुक्यातील डुबेर गावाच्या शिवारातील निर्जनस्थळी येवून तेथे त्याचा मृतदेह टाकून पळून गेला. रात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास विशाल नाशिक रोड येथे स्वप्निलच्या घरी आला. त्याला बाहेर जेवायला चल असा आग्रह धरला. मात्र त्याच्यासोबत जाण्यास त्याने नकार दिल्याने तो रात्री दीड वाजण्याच्या सुमारास घरी परतला. रात्री उशीरापर्यंत रामजी घरी आला नाही म्हणून त्याचे आई - वडील अस्वस्थ झाले होते. ते विशाल घरी येण्याची वाट पहात होते, कारण रामजी हा दुपारपासून त्याच्यासोबतच गेला होता. विशाल घरी येताच रामजीच्या आई- वडीलांना हायसे वाटले. रामजी घरी आला असे त्यांना वाटले, पण गाडीतून विशाल एकटाच उतरल्याचे पाहून त्यांनी रामजीची चौकशी केली. तेव्हा विशालने त्यांना सांगितले की, रामजीला आपण रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास गाडेकर मळ्यातील मंदिरात सोडले होते अशी थाप मारली. तो अजून घरी आला नाही का, असे उलट तोच रामजीच्या आई-वडीलांना विचारु लागला. यामुळे त्यांच्यात वाद सुरु झाला. त्यांचा आरडाओरडा ऐकून रात्री गस्तीवरील नाशिक रोड पोलीस पथकाने गाडी थांबवली. पोलिसांनी त्यांच्याकडे विचारपूस केली असता रामजी नावाचा लहान मुलगा बेपत्ता झाला असून तो दुपारपासून विशालबरोबर गेल्याचे समजले. शिवाय रामजीच्या आई-वडीलांनी त्याच्यावरच संशय घेतल्याने पोलिसांनी त्याला गाडीत टाकून पोलीस स्टेशनला आणले. रामजी दुपारी घराबाहेर पडला होता, तो घरी आला नसल्याचे समजल्यावर त्याचे वडील लालबाबू यांनी रामजीच्या शाळेत, नातेवाईकांकडे जावून, शेजाऱ्या-पाजाऱ्यांकडे चौकशी करुन त्याचा शोध घेतला. मात्र रामजी कुठेच मिळून आला नाही. त्यांना विशालचीच आशा होती. मात्र ती देखील फोल झाल्यामुळे त्याला पोलीस स्टेशनला आणले गेले. पोलीस उपायुक्त अमोल तांबे, सहाय्यक पोलीस आयुक्त समीर शेख, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरज बिजली आदींनी विशालकडे रामजीबाबत चौकशी केली असता तो ताकास सूर लागू देईना. उलट- सुलट व उडवा-उडवीची उत्तरे देवून केलेल्या गुन्ह्याची माहिती लपवू लागला. पोलिसांनी आपला पोलिसी खाक्या दाखवल्यावर मात्र त्याने गुन्ह्याची कबुली दिली, शिवाय आपल्यासोबत असलेला मित्र स्वप्निल सोनवणे याची पण माहिती दिली. पोलिसांनी नाशिक रोडला जावून स्वप्निल सोनवणे यास ताब्यात घेवून पोलीस ठाण्याला आणले. रामजी रात्री आमच्यासोबत होता. सिन्नरला जाण्यासाठी आमच्या गाडीत एक प्रवासी बसला होता. त्याला चाकूने वार करून त्याचा मोबाईल फोन व चार हजार रूपये लुटले होते अशी माहिती सांगत आमच्यासोबत रामजी पण होता अशी कबुली स्वप्निलने दिली. रामजीचा खून करून मृतदेह डुबेरे गावाच्या परिसरात टाकून माघारी परतलेल्या विशालने लगेच स्वप्निलचे घर गाठले. त्याला 'बाहेर जेवायला चल' असा आग्रह केला. मात्र घाबरलेल्या स्वप्निलने नकार दिल्याने विशालचा नाईलाज झाला. स्वप्निल त्याच्यासोबत गेला असता तर विशालने त्याचाही काटा काढला असता अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली. पोलीस खाक्या दाखवल्यानंतर विशाल पोपटासारखा बोलू लागला. त्याने सांगितले की लिफ्ट देवून कारमध्ये बसवलेल्या सिन्नरच्या प्रवाशाला चाकूने मारून त्याच्याकडून लुटलेला मोबाईल व पैशांची माहिती मी घरी आई - वडीलांना सांगेन असे रामजी म्हणाला, आपले बिंग फुटेल या भीतीने मी घाबरलो आणि सिन्नर तालुक्यातील डुबेरे गावाजवळ नेवून टॉवेलने त्याचा गळा आवळून खून केला, त्याचा मृतदेह डुबेरे येथे स्मशान भूमीजवळील नदीपात्रात फेकून दिल्याची माहिती विशालने देताच रामजीचे आई-वडील ओक्साबोक्सी रडू लागले. विशालला सोबत घेवून पोलिसांनी घटनास्थळ गाठले. सिन्नर तालुक्यातील डुबेरे गावाच्या स्मशान भूमीजवळील नदीपात्रात रामजीचा मृतदेह पडलेला होता. त्याच्या गळ्यावर गळफास दिल्याचे व्रण होते. एका निरागस बालकाचा क्रूरपणे खून करण्यात आल्याने पोलिसांचे मनहीं हेलावले. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. आपण केलेल्या लुटीची वाच्यता रामजी करेल अशी भीती वाटल्याने विशाल या नराधमाने त्याला ठार मारल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी लालबाबू यादव याने दिलेल्या फिर्यादीनुसार रामजीचे अपहरण करुन त्याचा गळा दाबून खून केल्याचा गुन्हा विशाल गेंजगे या नराधमाविरोधात दाखल केला. तसेच प्रवासी विजय आव्हाड याच्या फिर्यादीवरुन विशाल गेजगे व त्याचा मित्र स्वप्निल सोनवणे या दोघांविरोधात मोबाईल व चार हजार रुपये लुटल्याचा दुसरा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दोघा आरोपींना अटक करत गजाआड केले. पोलीस आयुक्त दिपक पाण्डेय यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अमोल तांबे, सहाय्यक आयुक्त समीर शेख, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरज बिजली, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांनी अवघ्या दोन तासांत तपासाचे काम हाती घेतल्यानंतर या बालकाचा खून झाल्याचे उघड झाले. परप्रांतीय नागरिकांनी पोलीस निरीक्षक सुरज बिजली यांची भेट घेवून आरोपीला कठोर शिक्षा लवकर व्हावी अशी मागणी केली.

### वाहिनीच्या हत्येची सुपारी देऊन फसला...

कट उघड झाला. जया भगत ही मटका किंग सुरेश भगतची पत्नी आहे. २०१३ मध्ये सुरेश भगतच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवत जया भगतला पाच वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. सध्या ती जामीनावर बाहेर आहे. मुंबईतील गँगवॉरची आठवण करुन देणाऱ्या या हत्येच्या कटामागे सुरेश भगतचा लहान भाऊ विनोद भगत सहभागी होता. सुरेश भगतच्या हत्येचा बदला घेण्यासाठीच हा कट रचण्यात आल्याचा पोलिसांना संशय आहे. मुंबई पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद भगतला भावाच्या हत्येचा बदला घ्यायचा असून मटका व्यवसायावर पूर्णपणे नियंत्रण मिळवायचं आहे. यासाठी त्याने युकेमधील कॉन्ट्रॅक्ट किलर बशीर उर्फ मामू याला ६० लाखांची सुपारी दिली. बशीर उर्फ मामू याला भगतने मनी ट्रान्सफरच्या माध्यमातून सुपारी दिली. यानंतर रणवीर शर्मा उर्फ पंडित याला १४ लाख रुपये पाठवण्यात आले. पंडित याने हत्येसाठी तिंघांना नेमलं होतं, अशी माहिती मुंबई क्राइम ब्रांचचे डीसीपी अकबर पठाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुढे त्यांनी सांगितलं की, एकदा पैसे मिळाल्यानंतर बिजनौर स्थित शूटर्सनी जया आणि तिच्या बहिणीच्या घराची रेकी करण्यास सुरुवात केली. फेब्रुवारीत हे सर्व सुरु झालं होतं. पण लॉकडाउनमुळे त्यांना आपला प्लॅन पुढे ढकलावा लागला. नंतर त्यांनी पुन्हा एकदा कामाला सुरुवात करत शस्त्र तसंच फोटो मिळवले होते. अन्वर दर्जी याला अटक केल्यानंतर त्याचे सहकारी पंडीत आणि जावेद यांनाही उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधून अटक करण्यात आली. त्यांनी बशीर आणि विनोद भगतची माहिती दिल्यानंतर त्यांनाही अटक करण्यात आली. भगत कुटुंबात मटक्याच्या व्यवसायावरून वाद आहेत. प्रत्येकाला मटक्याच्या हा व्यवसाय स्वतःच्या ताब्यात हवा आहे. सुरुवातीला सुरेश भगत हा सर्व व्यवसाय पाहात होता. मात्र, त्याची पत्नी जया भगत हिला या व्यवसायावर कब्जा मिळवायचा होता. यामुळे तिने त्याची हत्या केली. तर विनोद भगत यालाही या व्यवसायाचा ताबा हवा असल्याने त्याने आता जयाची सुपारी दिल्याचं उघडकीस आलं आहे. जया सोबत तिच्या बहिणीची हत्या करण्याची सुपारीही देण्यात आली होती. प्रत्येकीच्या हत्येसाठी तीस लाख रुपयांची सुपारी देण्यात आली होती, असं पोलीस सूत्रांनी सांगितलं. मुंबई क्राइम ब्रांचच्या युनिट ९ ने अन्वर दर्जीला १८ डिसेंबरला दोन गावठी बंदुका आणि सहा जिवंत काडतुसांसोबत अटक केली होती. यावेळी त्याच्याकडे जया भगत आणि तिच्या बहिणीचे फोटो आढळले. त्याच्याकडे जया राहत असलेल्या परिसरातील व्हिडीओदेखील होते. प्राथमिक तपासात दर्जी याला विनोद भगतने जया आणि तिच्या बहिणीच्या हत्येचं कॉन्ट्रॅक्ट दिल्याचं समोर आलं. दर्जी याला जावेद अन्सारीने आणि जावेदला रमवीर शर्मा उर्फ पंडितने हत्या करण्यास सांगितलं होतं. पंडित आणि गँगलाही बशीर बेगानी उर्फ मामूने ही हत्या करण्यास सांगितलं होतं. तो सध्या युकेमध्ये आहे. सुरेश भगत हा कल्याण मटका मार्केटचं नियंत्रण करायचा जिथे दिवसाला हजारो कोटींचा सट्टा बाजार चालायचा. २००८ मध्ये अलिबागला जात असताना सुरेश भगतच्या गाडीला वेगवान ट्रकने धडक देत हत्या करण्यात आली होती. सुरेश भगतची पत्नी जया आणि मुलगा हितेश यांनी अरुण गवळी गँगमधील सुहास रोगेला हत्येसाठी सुपारी दिली होती. मुंबई पोलिसांना छडा लावत जया, हितेश आणि इतरांना अटक केली होती. २०१४ मध्ये हितेशचा कोल्हापूरमधील रुग्णालयात मृत्यू झाला. जया भगतला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून सध्या ती जामीनावर बाहेर आहे.

### दारू पिऊन आलेल्यांना त्यांनी हटकले...

दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. किशोर पाटील कुंझरकर हे एरंडोल या तालुक्याच्या ठिकाणी राहणारे शिक्षक होते. त्यांना राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला होता. गालापुर जिल्हा परिषद शाळेचे ते मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. शैक्षणीक क्षेत्रात किशोर पाटील कुंझरकर हे नाव सर्वांना चांगल्या प्रकारे परिचीत होते. विविध वृत्तपत्रांना माहितीपर लेख देण्यात त्यांचा हातखंडा होता. दिनविशेष या सदरात माहितीपर लिखान वृत्तपत्रांना वेळोवेळी देण्याचे काम ते आवर्जुन करत होते. मंगळवार दि. ८ डिसेंबर रोजी किशोर पाटील यांचा दिनक्रम व्यस्त होता. एरंडोल येथील संताजी गृपने आयोजीत केलेल्या संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. या कार्यक्रमात त्यांनी मनोगत देखील व्यक्त केले. त्यानंतर सायंकाळी भुसावळ येथील माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी ते भुसावळला गेले होते. भुसावळ येथून रात्री साडे दहा वाजता ते एरंडोल येथे घरी परतले. त्यानंतर लागलीच दुस-या दिवशी भल्या पहाटे त्यांना धुळे येथे मित्राकडे व तेथून सुरत येथे जाण्याचे नियोजन होते. ९ डिसेंबरच्या भल्या पहाटे साडे तिन वाजता त्यांनी तयारी करुन घर सोडले. त्यांची शिक्षीका असलेली पत्नी झोपेत असल्यामुळे त्यांनी तिला जागे केले नाही. मुलाला दरवाजा आणि गेट लावून घेण्यास सांगीतले. मुख्याध्यापक किशोर पाटील हे पायीच बस स्थानकाच्या दिशेने चालत गेले. वाटेत एरंडोल शहरातील धरणगाव चौफुली परिसरात आले असता त्याठीकाणी तेथे एक शेकोटी पेटलेली त्यांना दिसली. थंडी वाजत असल्यामुळे मुख्याध्यापक कुंझरकर रस्त्याच्या कडेला त्या शेकोटीवर बसले. दरम्यान त्याठिकाणी वाल्मीक रामकृष्ण पाटील (३२) व आबा भारत पाटील (२५) हे दोघेही सोनबर्डी येथील तरुण दुचाकीने आले. वाल्मिकच्या भाचीचा हळदीचा कार्यक्रम अंजनविहीरे येथून आटोपून दोघेही एरंडोल येथे आले होते. हळदीच्या कार्यक्रमात दोघांनी मद्यप्राशन केले होते. त्या मद्याचा अंमल दोघांवर अजून कायम होता. त्यामुळे त्यांच्या हालचाली दोलायमन होत्या. त्यातच ते दुचाकी चालवत आले होते. शिक्षक कुंझरकर व हे दोघे मद्यपी असे तिघे जण शेकोटीजवळ बसले होते. दोघे तरुण मद्याच्या धुंदीत तर्रर झाले होते. त्यांना काय बोलावे हेच सुचत नव्हते. त्यातच शिक्षकी पेशा असलेल्या किशोर पाटील यांना राहवले गेले नाही. त्यांनी दोघांना दारु पिण्यावरुन हटकले. दारु पिण्यावरुन हटकल्याचा राग आबा व वाल्मिक या दोघा मद्यपींना येण्यास अजिबात वेळ लागला नाही. त्यामुळे मद्याच्या नशेत दोघांनी मिळून शिक्षक किशोर पाटील यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. काहीवेळाने किशोर पाटील यांनी ते भांडण कसेबसे मिटवले. ते बस स्थानकाजवळ असलेल्या वॉटर एटीएम जवळ आले. दोघांचा राग शांत झालेला नव्हता. तसेच किशोर पाटील यांचे समजावणे त्यांच्या पचनी पडत नव्हते. त्यामुळे दोघा मद्यपींनी बस स्थानकावर पुन्हा मारहाण करण्यास सुरुवात केली. दोघे मद्यपी आडंदाड वृत्तीचे व शरीरयष्टीचे असल्यामुळे त्यांनी किशोर पाटील यांच्यावर जणूकाही कब्जाच केला होता. बस स्थानकावर दोघांनी किशोर पाटील कुंझरकर यांच्यावर पुन्हा हल्ला चढवला. या हल्ल्यात ते अर्धमेले झाले. या घटनेच्या वेळी काही लोक तेथे आले. मात्र कुणीही त्यांचा वाद व हाणामारी सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. या हाणामारीत आदर्श शिक्षक कुंझरकर हे डोक्यावर आपटले गेले. त्यात ते अर्धमेले झाले. तशाच अवस्थेत दोघा मद्यपींनी त्यांना त्यांच्या ताब्यातील दुचाकीने मध्यभागी ट्रिपलसिट बसवले. त्यांना पळासदर शिवारात नेले व तेथेच सोडून दिले. दरम्यान कुंझरकरांनी आपले प्राण सोडले होते. त्यांना तशाच अवस्थेत सोडून पलायन करण्यापुर्वी दोघा मद्यपींनी कुंझरकर यांच्या खिशातील पाकीट व मोबाईल काढून घेत पलायन केले. पळासदड शिवारात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पडून असल्याची माहिती कुणीतरी एरंडोल पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक तुषार देवरे यांना कळवली. माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. किशोर पाटील हे शिक्षक अनेकांना चांगल्याप्रकारे परिचित होते. त्यामुळे त्यांची ओळख पटण्यास वेळ लागला नाही. आदर्श शिक्षक किशोर पाटील-कुंझरकर यांचा मृतदेह धरणगाव ग्रामीण रुग्णालय व तेथून उत्तरीय तपासणीकामी जळगाव येथे रवाना करण्यात आला. पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. त्यात त्यांना अनेक शंकास्पद बाबी दिसून आल्या. किशोर पाटील यांच्या अंगावरील शर्टाचे बटन तुटलेले आणि बनियन फाटलेला होता. घराबाहेर पडताना घातलेले स्वेटर त्यांच्या अंगावर नव्हते. ते मृतदेहापासून सुमारे २० फुटाच्या अंतरावर लांब पडलेले होते. किशोर पाटील यांच्या पायात बूट आणि खिशातील मोबाइल व पाकिट गायब झालेले होते. एरंडोल पोलिसांनी मयत किशोर पाटील यांची पत्नी, मुलगा, मुलगी, सासरे यांचे इन कॅमेरा जबाब तपासकामी घेतले. झटापटीनंतर हा खून झाल्याचा अंदाज यावेळी लावण्यात आला. उत्तरीय तपासणीनंतार सायंकाळी शोकाकुल वातावरणात एरंडोल येथील मरिमाता मंदिरानजीक स्मशानभूमीत किशोर पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेप्रकरणी एरंडोल पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ९०/२० भा.द.वि. ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरणकुमार बकाले व त्यांचे सहकारी करत होते. दोघे मद्यपी आरोपी शिक्षक कुंझरकर यांना मारहाण करत असतांना काही लोक हा प्रकार बघत होते. मात्र पोलिसांपुढे कुणीही माहिती देण्यासाठी पुढे आले नाही अथवा पोलिसांच्या आवाहनाला देखील कुणी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे पोलिस तपासात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या होत्या. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील संबंधीत भागातील सीसीटीची फुटेज संकलीत केले. त्यात हॉटेल एकविरा मधील कॅमे-यात झटापटी होतांनाचे चित्रीकरण कैद झाले होते. काही जणांनी ती घटना पाहिल्याचे तपासात उघड झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरणकुमार बकाले, सहायक फौजदार विजय पाटील व नरेंद्र वारुळे यांनी या गुन्ह्याचा उलगडा होण्यासाठी हायटेक तंत्रज्ञानाचा वापर केला. किशोर पाटील यांच्या घरी जावून पथकाने घटनेच्या दिवशी घटनेच्या कालावधीतील मोबाईल कॉल डिटेल्स ट्रेस केले. त्यानंतर घटनास्थळावरील कॉल ट्रेस केले. एरंडोल शहरात केवळ एकच मोबाईल टॉवर असल्यामुळे तपासकाम सोपे झाले. कुंझरकर यांचे घर ते घटनास्थळ तसेच घटनेशी संबंधीत असलेल्या दोन तासांच्या कालावधी दरम्यान पोलिसांना १३४ जण संशयास्पद वाटले. या संशयास्पद १३४ जणांना कुठलीही खबर लागू न देता त्यांच्यावर गुप्तरितीने पाळत ठेवण्यात आली. यातील १४ जण जास्त प्रमाणात संशयास्पद दिसून आले. तपास पुढे पुढे सरकत असतांना आबा पवार हे हनुमंतखेडा ता. एरंडोल असे नाव पुढे आले. हवालदार विजयसिंग पाटील व सुधाकर अंभोरे या दोघांनी चिकाटीने हनुमंतखेडा या गावात काही ओळखीच्या लोकांशी संपर्क साधला. मात्र अशा नावाची कुणी व्यक्ती या गावात रहात नसल्याची माहिती पुढे आली. मात्र विजयसिंग पाटील व सुधाकर अंभोरे या दोघांनी चिकाटी सोडली नाही. पवार आडनावाचे सर्वाधिक लोक नजीकच्या सोनबर्डी या गावात रहात असल्याची त्यांनी माहिती मिळवली. सोनबर्डी या गावाचे पोस्ट हनुमंतखेडा असे आहे. सरकारी कामाकाजाच्या तांत्रीक व अपुर्ण माहितीमुळे आबा पवार याच्या गावाचे नाव गायब झाले होते. अखेर विजयसिंग पाटील व सुधाकर अंभोरे या दोघांनी वरिष्ठंच्या मार्गदर्शनाखाली चिकाटीने तपासकाम सुरुच ठेवले. हवालदार विजयसिंग पाटील, सुधाकर अंभोरे, शरद भालेराव, आर.के.पाटील, राहुल पाटील व भगवान पाटील यांच्या मदतीने आबा पवार या नावाची माहीती काढण्यास सुरुवात केली. संशयाची सुई फिरत असलेल्या आबा पवार याचा भाऊ त्यांना गवसला. आबाचा हरवलेला मोबाईल परत द्यायचा आहे असे सांगून आबा यास शिताफीने रात्री गावाच्या बाहेर बोलावून घेण्यात आले. त्याला ताब्यात घेत बोलबच्चन वापरुन विचारपुस केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. त्याने दिलेल्या माहितीतून वाल्मिक रामकृष्ण पाटील याचे नाव पुढे आले. अशा प्रकारे आबाच्या माध्यमातून वाल्मिक पाटीलचे नाव पुढे येताच त्याला ताब्यात घेण्याची तयारी सुरु करण्यात आली. आबा यास पकडले असून पोलिस आपल्या मागावर असल्याची कुणकुण लागण्यापुर्वी वाल्मिक यास ताब्यात घेणे गरजेचे होते. त्यामुळे क्षणाचाही विलंब न करता सुधाकर अंभोरे यांनी इतरांच्या मदतीने वाल्मिक रामकृष्ण पाटील यास शिताफीने सापळा रचून ताब्यात घेतले. शिक्षक किशोर पाटील कुंझरकर व दोघे हल्लेखोर एकमेकांना ओळखत नव्हते. केवळ दारु पिण्यास हटकल्यामुळे रागाच्या भरात दोघांनी शिक्

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:11 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### लातूर महापालिका हद्दीत रात्री संचारबंदी

लातूर : राज्यात कोविड -१९च्या प्रादुर्भाचा धोका कमी करण्याच्या व नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.कोविड-१९ या संसर्गजन्य आजारास प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका हद्दीत रात्री ११.०० ते सकाळी ६.०० वाजपर्यंत संचारबंदी लागू करण्याण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष पृथ्वीराज बी.पी यांनी दि.२२ डिसेंबर २०२० ते ५ जानेवारी २०२१ या कालावधीत लातूर शहर महापालिका,लातूर हद्दीत रात्री ११.०० ते सकाळी ६.०० वाजपर्यत संचारबंदी लागू करण्यात आली असल्याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशात महाराष्ट्र शासन व जिल्हाधिकारी लातूर यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशान्वये देण्यात आलेल्या अत्यावश्यक/जीवनाश्यक सेवा तसेच वस्तू यांना सूट सवलत असेल. कोविड-१९ प्रतिबंधात्मक नियम शारिरिक अंतर, फेसमास्कचा वापर, वैयक्तिक स्वच्छता इत्यादी सावधगिरीच्या नियमांचा काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या आदेशान्वये उल्लघन झाल्याचे निदर्शनास आल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियमन २००५,साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये दिलेल्या तरदुदीनुसार भारतीय दंड संहिता-१८६० चे ककलम १८८ नुसार तसेच महाराष्ट्र कोविड १९ उपयोनजना नियम २०२० च्या तरतुदीनुसार कर्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असेही आदेशात नमुद केले आहे.

### जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी

लातूर : प्रवेश फेरी १ ते ४ दरम्यान ज्या उमेदवारांना कोणत्याही व्यवसायात प्रवेश मिळाला नाही त्यांना प्रवेशासाठी संपूर्ण जिल्हयातील शासकीय व खाजगी आय.टी.आय मध्ये रिक्त जागावर प्रवेश घेण्यासाठी जिल्हा समुपदेशन फेरी होत आहे.तरी उमेदवारांनी पूढील प्रक्रिया करावी लागेल. शासकीय व खाजगी आय.टी.आय मधील रिक्त जागाची माहिती वेबसाईट पाहणे दि. २४ डिसेंबर २०२० सायं. ०५.०० वाजात. अर्ज केलेल्या उमेदवारांनी रिक्त जागेनुसार डेसळप होवून जिल्हा निवडणे, नोंद करणे दिनांक २५ डिसेंबर २०२० सकाळी ८.०० पासून, ते दिनांक २६ डिसेंबर २०२० सायं. ५.०० वाजेपर्यंत. जिल्हास्तरीय फरीसाठी मेरीट लिस्ट व हजर राहणेसाठी दिनांक व वेळ डचड व्दारे कळेल. दिनांक २७ डिसेंबर २०२० सायं.५.०० वाजेपर्यंत. दिलेल्या दिनांकास व वेळेत जिल्हास्तरीय संस्थेत हजर राहून उपलब्ध जागेतून अलॉटमेंट लेटर घेणे. दिनांक २९ डिसेंबर २०२० सकाळी ८.०० पासून ते दिनांक ३० डिसेंबर २०२० सांय. ५.०० वाजेपर्यंत. लेटर मिळालेल्या संस्थेत, व्यवसायात मुळ प्रमाणपत्र तपासून प्रवेश निश्रिचत करणे दिनांक २९ डिसेंबर २०२० सकाळी ८.०० पासून ते दिनांक ३१ डिसेंबर २०२० सांय. ५.०० वाजेपर्यंत.

### स्वातंत्र्यसैनिक व्यंकोबा बिरादार यांचे निधन

देवणी : तालुक्यातील धनेगाव येथील रहिवाशी स्वातंत्र्य सैनिक व्यंकोबा पिराजी बिरादार वय १०४ वर्ष यांचे वृध्पकाळाने शुक्रवारी सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. यांच्या पश्च्यात तीन मुले, चार सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही महाराष्ट्रातील मराठवाड्यावर हैद्राबादच्या निजामाची सत्ता होती. दरम्यानच्या जुलमी रझाकाराशी मराठवाड्याला या रझाकाराच्या जुलमातुन मुक्त करण्यासाठी कर्नाटकातील अट्टरगा येथील सैनिकासोबत व्यंकोबा बिरादार यांचे फार मोठे योगदान होते. त्याच्या कार्याची दखल घेत धनेगावकरांनी सलग २० वर्ष सरपंच म्हणुन गावचा कारभार सोपवला होता. गावासह पंचक्रोशीत ते पिताजी या नावाने परिचित होते. माजी सरपंच तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव बिरादार यांचे ते वडील होत.

### इंग्लंडहून आलेल्या प्रवाशांचे विशेष सर्वेक्षण

लातूर : सध्या इंग्लंडमधील काही भागात कोरोना विषाणुच्या जनुकीय रचनेत कांही बदल झालेला नविन विषाणु स्ट्रेन आढळुन आलेला असुन या विषाणुचा प्रसार नेहमीपेक्षा अधिक वेगाने होऊ शकतो असे तज्ञांचे मत आहे. या पार्श्वभुमीवर केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात २५ नोव्हेंबर २०२० नंतर इंग्लंडहून आलेल्या प्रवाशांचे विशेष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तेंव्हा ज्या कोणी व्यक्ती २५ नोव्हेंबर २०२० नंतर इंग्लंडहून आपल्या जिल्हयात आले आहेत त्यांनी स्वत: होऊन जिल्हयाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य संस्थेशी अथवा महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधुन या सर्वेक्षणास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. डॉ. गंगाधर परगे यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान!

लातूर : जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांनी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२०-२१ अंतर्गत लातूर जिल्हयासाठी फलपिक लागवड, मशरुम उत्पादन, शेडनेट हाऊस, प्लॅस्टिक मल्चिंग, टॅक्टर २० एचपी, शेतकरी अभ्यास दौरा, सामुहिक शेततळे, वैयक्तीक शेततळे अस्तरीकरण, कांदाचाळ, पॅक हाऊस व प्राथमिक प्रक्रिया केंद्र इत्यादी घटकांसाठी इच्छुक शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. महा-डीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahait.gov.in/ संकेत स्थळ आहे. या संकेतस्थळावर शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. संगणक/लॅपटॉप, सामुदायिक सेवा केंद्र (CSC) ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र इ. माध्यमातून उक्त संकेतस्थानावर जाऊन अर्ज करावयाचे आहे. त्याकरिता पोर्टलवर अर्ज करण्यासाठी लागणारी कागदपत्रे ७/१२,८ अ, बँक पासबुक व आधारकार्ड लिंक असलेला मोबाईल सोबत असणे आवश्यक आहे. सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी महा-डीबीटी पोर्टलवर विविध घटकांसाठी अद्याप अर्ज केला नसेल त्यांनी दिनांक ३१ डिसेंबर २०२० अखेर पर्यंत आपले अर्ज पोर्टलवर भरावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

क्राईम Reporter
क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

# अहमदपूरात ३१ लाख ५० हजारांचा गुटखा जप्त

## उप-विभागीय पोलिस अधिकारी पथकाची कामगिरी

**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर तालुक्यातील वंजारवाडी पाटी लगत असलेल्या मदन मुसळे यांच्या आखाड्यावरील गोडाऊनवर अहमदपूर उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पोलिस पथकाने छापा मारून सुमारे ३१ लाख ५० हाजर रूपयांचा गुटखा जप्त करत उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. या प्रकरणी किनगाव पोलिस ठाण्यात तीघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिसांच्या या धडक कारवाहीने साठे बाजार करून बेभाव किमतीत सुगधी तंबाखू व गुटखा विक्री करणाऱ्या गुटखा माफि यांचे धाबे दणाणले आहेत.

याबाबत पोलि सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, अहमदपूर तालुक्यातील वंजारवाडी पाटी लगत असलेल्या मदन मुसळे यांच्या शेतातील आखाड्यावरील असलेल्या गोदामात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची साठवन केली असल्याची गुप्त माहीती अहमदपूर उपविभागीय पोलिस अधिकारी बलराज लंजिले यांना मिळाली होती. मिळालेल्या माहीतीवरून जिल्हा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखी उप -विभागीय पोलीस अधिकारी बलराज लंजिले यांनी तात्काळ पि.एस आय गुट्टे, रेचवाड, नरहरे, गुट्टे, होमगार्ड गंगथडे, मुंडे आदी कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून दि २४ डिसें रोजी दुपारी १.४५ वाजता सदरील गोडाऊन वर छापा टाकला असता त्याठीकाणी ३० मोठे पांढऱ्या रंगाचे गोवा गुटख्याने ज्यामध्ये प्रत्येक मोठ्या पोत्यामध्ये छोटे सहा बॅग प्रत्येक बॅगेत गोवा गुटख्याचे ५० पॅकेट ज्याची प्रत्येक पॉकीटची किंमत ३५० रू प्रमाणे अशी एकुण मोठ्या पोत्याची किंमत १ लाख ५ हजार रुपये प्रमाणे ३० पोत्याची एकुण अंदाजे किंमत ३० लाख ५० हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात राजु गुरूलिंगअप्पा हामणे (रा.सुमठाना ता.अहमदपूर), सुधाकर माणिक पुट्टेवाड (रा.नळेगाव ता. बोथ जि अदिलाबाद), मदन मुसळे (रा.सुमठाना) यांच्या विरूद्ध किनगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला. पोहेकॉ नरसिंग नरहरे यांच्या फिर्यादीवरून गुरनं १७५/२० कलम १८८, २६९, २७२, २७३, ३२८,१२० ब भादवी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास किनगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक खुब्बा चव्हाण हे करीत आहेत. तपासकामी बिट जमादार धुळगुंडे व महेबुब शेख हे सहकार्य करीत आहेत.

# पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी बिराजदार कुटुंबीयांची घेतली भेट

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिकेचे उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांचे वडील गुरुनाथआप्पा बिराजदार यांचे ९ डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दिनांक २४ डिसेंबर रोजी सायंकाळी एलआयसी कॉलनी, रिंग रोड लातूर येथील उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला. यावेळी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, मनपा विरोधी पक्षनेते दीपक सूळ, मोईज शेख, समद पटेल, लक्ष्मण कांबळे, आसिफ बागवान, नगरसेवक युनुस मोमिन, आयुब मनियार, महेश काळे, मोहन सुरवसे, व्यंकटेश पुरी, प्रवीण घोटाळे यांच्यासह बिराजदार कुटुंबातील सुरेश गुरुनाथ बिराजदार, शिवम बिराजदार, ओमकार बिराजदार, प्रीतम बिराजदार व बिराजदार कुटुंबीय उपस्थित होते.

# गावठीकट्ट्यासह फरारी गुंडाला अटक

**कासारवडवली/प्रतिनिधी**

मोक्का आणि खुनाच्या गुन्ह्यातील एका फरारी आरोपीला गावठी कट्ट्यसह अटक करण्यात कासारवडवली पोलिसांना यश आले आहे. कासार वडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत वरिष्ठांनी कासारवडवली पोलिसांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस सतर्क राहून कारवाई करीत असतानाच २५/१२/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांना खास बातमीदाराकडून माहिती मिळाली कि घोडबंदर रोडवरील आनंदनगर बस स्टोप जवळ एक इसम अग्निशस्त्र विकण्यासाठी येणार आहे. सदर माहिती मिळताच पोलिसांनी सापळा लाऊन अभिमन्यू रामसागर तिवारी ४४ या इसमास ताब्यात घेऊन त्याच्याकडील अग्निशस्त्र ताब्यात घेतले. या प्रकरणी त्याच्यावर गु.र.करा. ३२०/२०२०अ धिनियम १९५९च्य कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७१ १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. चौकशीत तो रेकार्डवर असलेला गुन्हेगार असल्याचे समजले. तसेच खून आणि मोक्का प्रकरणात तो २०१८ पासून फरारी होता आणि ठाणे मुंबई शहरात मारामारी जुगार आदी ५ गुन्ह्याची नोंद आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर सह पो.आयुक्त सुरेशकुमार मोकळा, अप्पर पो.आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे अनिल कुंभारे, पोलीस उपयुक्त विनयकुमार राठोड, वर्तक नगर विभागाचे सहा.पो.आयुक्त पंकज शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर खैरनार पो.नि.जयराज रमवरे, अविनाश काळदाते, वैभव धुमाळ, स.पो.नि, सागर जाधव, सहदेव पालवे, पो.हवा.उदय कोरे, आर एस चौधरी, तुषार पाटील, रवींद्र रावते, मनोजकुमार पवार, रमेश जाधव, संतोष गायकवाड, राजकुमार पाटील, सुजित खरात, महेंद्र लिंगाळे, प्रमोद तायडे, महापुरे, मनोज महाजन आदींनी भाग घेतला.

# राष्ट्रीय महामार्गावर ट्रकसह माल पळविणाऱ्या टोळीतील पाच दरोडेखोर पोलिसांच्या ताब्यात

**सोलापूर/इरप्पाबोरीकरजगी**

गेल्या शनिवारी १९ डिसेंबर रोजी. रात्रौ २२.३० ते २२ .५० वाजण्याच्या दरम्यान ट्रक चालक तयब लतीब फुलारी (२७) हा आपले ताब्यातील १२ चाकी ट्रक केए ५६-३६३३ मधून २५ टन कांदा लोड करून श्रीरामपूर जि. अहमदनगर येथून घेवून ते परतीपाडू विशाखापट्टनम येथे पोच करण्यासाठी घेवून सोलापूर हैद्राबाद जाणाऱ्या रोडवर बोरामणी गांवचे पुढे जात असताना अचानक एक विना नंबरची सिल्व्हर रंगाची इनोव्हा कार ट्रकला ओव्हरटेक करून, ट्रकला कार आडवी लावून कारमधून पाच पैकी चार इसम खाली उतरून चालक व क्लिनरला शिविगाळ करून त्या दोघांना ट्रक मधून खाली ओढून लाथाबुक्याने मारहाण करून, त्यांचे ताब्यातील कांदयाने भरलेले ट्रक जबरदस्तीने दरोडा टाकून घेवून गेले म्हणून तयब लतीब फुलारी याने फिर्याद दिले वरून सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे गुरंन ७७०/२०२० भादविसंक ३९५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दरोडयाचे गांभीर्य ओळखून सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते व अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सदरचा दरोडा उघडकीस आणणेबाबत विषेश पथक तयार करणेबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे सपोनि शाम बुवा व पोलीस कर्मचारी यांचे पथक नेमण्यात आले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा करणारे गुन्हेगार हे सोलापूर शहरातील रामवाडी व रविवार पेठ सोलापूर येथील असून त्यांनी सदरचा गुन्हा करण्यासाठी त्यांचेकडील सिल्व्हर रंगाची इनोवा कारचा वापर करून गुन्हा केला असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली. त्यावरून पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी गुन्हे शाखेकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम बुवा यांचे पथकास कारवाई करणेकामी आदेशित केले होते. त्यानुसार सपोनि बुवा व त्यांचे पथकाने रामवाडी व रविवार पेठ भागातून पाच संशयित इसमांना इनोव्हा कारसह ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे सांगितले. गुन्हयातील ताब्यात घेतलेल्या संशयित इसमांकडून गुन्हयात चोरीस गेलेला एकूण ४७५ पोती कांदा, चोरलेला १२ चाकी ट्रक केए- ५६ - ३६३३ गुन्हा करण्यासाठी वापरलेली सिल्व्हर रंगाची इनोव्हा कार नंबर एमएच १३ सीडी ३६९९ व त्यांचे वापरते मोबाईल असा एकूण ४३ लाख ८२ हजार रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांपैकी काही आरोपीतांवर सोलापूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्रीमती तेजस्वी सातपुते, .अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे याचे मार्गदर्शनाखाली सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक शाम बुवा, सहा.पो.उपनिरीक्षक खाजा मुजावर, पो हवा.नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, पोकॉ. अक्षय दळवी, धनराज गायकवाड, रवि हाटकिळे, अन्वर अत्तार, चालक राहुल सुरवसे, राजेंद्र गव्हेकर यांनी केली आहे.

# जिल्हा बँकेच्या ऊस कर्ज वाटप; माजी मंत्री दिलीपराव देशमुखांचा अभिनंदनाचा ठराव!

**देवणी/शकिल मनियार**

राज्यात सहकार क्षेत्रातील जिल्हा बँकांमध्ये आघाडीवर असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यानी उस लागवडीसाठी तिन लाख रुपये कर्ज देण्याची घोषणा शेतकऱ्यांना केली आहे. त्याबद्दल त्यांचा शनिवारी देवणी तालुका शाखेत अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. यावेळी बँकेच्या शाखेत देवणी तालुक्याचे संचालक भगवानराव पाटील विजयनगरकर, जिल्हा मजुर संघाचे अध्यक्ष दिलीप पाटील नागराळकर, कृउबासे माजी सभापती गोविंदराव भोपणीकर, जिल्हा बँकेचे सरव्यवस्थापक तानाजी जाधव, जिल्हा बँकेचे वसुली व्यवस्थापक व्ही.जी. शिंदे, तालुका फिल्ड अधिकारी गणेश भाटकर उपस्तीत होते. यावेळी संचालक भगवानराव पाटील विजयनगरकर यानी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णय तिन लाख रुपये उस कर्ज देण्याचा ठरावाचे वाचन केले. याप्रसंगी सरव्यवस्थापक तानाजी जाधव यांनी उस कर्ज याबाबत माहिती दिली, तर दिलीप पाटील नागराळकर, गोविंदराव भोपणीकर यांचीही भाषणे झाली. बैठकीत होनाळी चे चेअरमन अनील पाटील यांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा अभिनंदनाचा ठराव मांडला, तर चेअरमन अंकुश बागवले यानी अनुमोदन दिले. बैठकीला तालुक्यातील विविध गावातील सोसायटीचे चेअरमन उपस्थित होते. सुत्रसंचालन व आभार इनस्पेक्टर व्ही.डि. चव्हाण यांनी केले.

# नुतन ग्रामसेवकांचा मनसे शाखेतर्फे सत्कार

देवणी : गावगाडा सुरळीतपणे उंचवण्याची प्रामुख्याने जबाबदारी शासनाच्या वतीने ग्रामसेवक निभावत असतो. सरपंच व गावकऱ्यांच्या मदतीने गावचा सर्वांगीण विकास साधण्यात प्रमुख भुमिका ही ग्रामसेवकाची असते. त्या ग्रामसेकांला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने दिनांक २४/१२/२०२० रोजी मोजे सोमनाथपूर उदगीर येथे मनसे शाखेच्या वतीने नूतन ग्रामसेवक करण कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कामगार सेनेचे तालुका अध्यक्ष दयानंद डोंगरे, शाखा अध्यक्ष गोविंद केंद्रे, शाखा उपाध्यक्ष भरत फड, शाखा सचिव आशिष ढगे, शाखा कोषाध्यक्ष बजरंग गोंदे इत्यादि उपस्थित होते.

# वाड्यात भाजप महिला आघाडीची बैठक उत्साहात संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

भाजप महीला आघाडीची बैठक वाडा येथील भाजपच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात सोमवारी रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पाडली असून ही बैठक भाजपचे जेष्ठ नेते व ठाणे ग्रामीणचे प्रभारी बाबाजी काठोळे यांच्या अध्यक्षतेखालील घेण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते काही महीला कार्यकर्त्यांना नियुक्तीपत्र देऊन जबाबदारी देण्यात आली. तालुक्यातील महीलांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. कुठेही महीलांना अन्याय, अत्याचार सहन करावा लागत असेल तर त्यांनी आमच्या महीला कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा. आमची संपूर्ण ताकद त्या महीले सोबत उभी करू असे आवाहन महीला आघाडीच्या तालुका अध्यक्ष अंकिता दुबेले यांनी आपल्या प्रास्ताविकातुन यावेळी केले. तसेच तालुका महीला आघाडीच्या आजवरच्या कार्याचा लेखाजोगा या आढावा बैठकीत त्यांनी ठेवला. महिला आघाडीच्या प्रदेश सचिव आम्रपाली साळवे, जिल्हाध्यक्षा ज्योती भोये, चंदा दुबे, गीतांजली सावे, धनश्री चौधरी आदींनी उपस्थित महीलांना यावेळी विषेश मार्गदर्शन केले. याप्रसंगी जेष्ठ नेत्या रंजना संखे, अर्चना पाटील, नगरसेविका रीमा गंधे, अंजनी पाटील, माजी सभापती निलिमा भोये, माजी. सभापती अश्विनी शेळके, पं.स. सदस्या सुवर्णा पडवले. पं.स.सदस्या कृपाली पाटील, संध्या थाळेकर, रजनी बोंड, योगिनी चौधरी, निकीता पाटील, उज्ज्वला देशमुख, साक्षी पाटील, दर्शना गव्हाळे, सुजाता कडव, योगीनी जाळेकर, रक्षा ठाकरे आदींसह महीला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:12 PM Page 1



# सरकारी चिडिया गोदी मीडिया!

प्रसार माध्यमांना कधी काळी लोकशाहीचा चौथा स्तभ म्हटले जायचे. कधी काळी या साठी म्हणावे लागतेय की आज इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे प्रसार माध्यमांची विश्वासार्हता पूर्णपणे धुळीला मिळाली आहे. पूर्वी प्रसारमाध्यमात काम करणारा पत्रकार म्हटलं की त्याच्याकडे लोक आदराने आणि विश्वासाने बघायचे. कारण तो लोकांच्या साठी काम करायचा लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार आणि प्रशासनाशी लढायचा म्हणून समाजाला त्याच्याविषयी आदर होता पण आज मात्र तोच पत्रकार सरकारचा किंवा राजकारण्यांचा दलाल बनून समाजाशी बेइमानी करतोय. वेश्यांचे दलाल आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया मधील विकाऊ पत्रकार यांच्यात काहीच फरक राहिलेला नाही. असे आज दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. सध्या कृषी कायद्याच्या विरोधात देशभर शेतकऱ्यांचे जे आंदोलन सुरू आहे त्या आंदोलनात प्रसारमाध्यमांची खास करून इलेक्ट्रॉनिक मीडियाची भूमिका खूप महत्त्वाची होती. कारण जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी च मीडिया आहे. पण इथे तर सरकारच्या खांद्याला खांदा लाऊन इलेक्ट्रॉनिक मीडियाच शेतकऱ्यांच्या विरोधात उभा ठाकला आहे. अशावेळी शेतकऱ्यांची न्याय बाजू समाजासमोर येणार तरी कशी? आणि त्यांना न्याय मिळणार तरी कसा? शेतकऱ्यांची बाजू मांडायची सोडाच उलट दिल्ली बॉर्डर वर लोकशाही मार्गाने शांतपणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना अर्णव गोस्वामी सारखे दलाल पत्रकार दहशतवादी, खलिस्तानी, ठरवत आहेत. आणि शेतकऱ्यांचे हे आंदोलन कशाप्रकारे चुकीचे आणि देशविरोधी आहे ते दाखवण्याचा प्रयत्न इलेक्ट्रॉनिक मीडिया कडून सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बदनाम करण्याची इलेक्ट्रॉनिक मीडियाची ही मोहीम कुठे तरी थांबायला हवी. कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि १३० कोटींच्या या कृषिप्रधान देशाचा ६३ कोटी शेतकरी हा अन्नदाता आहे तो शेतात दिवसरात्र, उन पावसाची तमा न करता राबतो म्हणून देशवासीयांना दोन घास सुखाचे मिळतात. ज्यात सत्ताधारी पक्षाचे लोक आणि शेतकऱ्यांशी बेइमानी करणारे हे इलेक्ट्रॉनिक मिडियावाले सुद्धा आले. मग ज्या शेतकऱ्यांचे अन्न खाता त्याचीच बदनामी करायला या हरामखोरांना जराही लाज लज्जा कशी वाटत नाही. अरे शेतकऱ्याला दहशतवादी, खलिस्तानी म्हणता तो खरोखरच तासा असता तर कडाक्याच्या थंडीत पोराबळणा घेऊन आंदोलन करीत बसला नसता तर त्याने शेतकरी विरोधी कायदा करणारे आणि त्यांच्या सांगण्यावरून शेतकऱ्यांना बदनाम करणाऱ्यांना गोळ्या घातल्या अस्त्या. तेंव्हा शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. आणि शेतकऱ्यांचं आंदोलन सरकारच्या विरोधात आहे. अशावेळी मिडियाचे लोक कशालामध्ये चोमडेपणा करीत आहेत. कारण ज्यांच जळत त्यालाच कळत! भारत हा जरी कृषिप्रधान देश असला तरी या देशातील शेतकऱ्यांची स्थिती फारशी चांगली नाही आणि त्याची कारणे सुद्धा अनेक आहेत. यातील सर्वात मोठं कारण म्हणजे शेती व्यवसाय. आता पूर्वीसारखा फायदेशीर राहिलेला नाही. निसर्गाच्या लहरीपणाचा वारंवार शेतीला फटका बसतोय. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टीमुळे केलेली मेहनत वाया जातेय. अशा स्थितीत प्रचंड मेहनत करून उत्पादन खर्च सुद्धा निघत नसेल तर त्या बिचाऱ्या शेतकऱ्याने काय करायचे? पण त्याच हे दुःख समजून घेण्यासाठी सरकार मध्ये शेतीची माहिती असणारे लोक असायला हवेत. पण ज्यांना कांदे बटाटे झाडाला लागतात की जमिनीच्या खालून उगवतात याची माहिती नाही ज्यांनी कधी शेतात पाय ठेवला नाही असे लोक सरकार चालवत असल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या वेदना काय समजणार.आणि नेमकी हीच गोष्ट मीडिया मधले दलाल समजून घेत नाहीत. सरकारने फेकलेल्या तुकड्यावर जगणाऱ्या या लोकांनी शेतकरी आंदोलनाला बदनाम करण्याची जणू काही सुपरीच घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना शेतकरी आंदोलनात विरोधी पक्षाचे षडयंत्र दिसतेय. थंडी वाऱ्यात कुडकुडत बसलेल्या शेतकऱ्यांमध्ये देशविरोधी कारवाया करणारे लोक दिसत आहेत. पण सुपरीबाज इलेक्ट्रॉनिक मिदियकडून शेतकऱ्यांना बदनाम करण्याचा किती जरी प्रयत्न झाला तरी शेतकरी प्रामाणिक आहे तो आपल्या हक्कासाठी लडत आहे. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास दांडगा आहे. म्हणूनच तो मागे हटणार नाही. आणि यापूर्वीही शेतकऱ्यांनी सहा सहा महिने आंदोलने केलेली आहेत. त्यामुळे माघार घेण्याचा प्रश्नच नाही. उलट शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या सरकारला माघार घ्यावी लागेल. कारण सरकार सोबत जरी मीडिया मधले भाडोत्री सुपरिबाज असले तरी शेतकऱ्यांच्या पाठीशी संपूर्ण देश उभा आहे आणि सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन कशा प्रकारे चिरडण्याचा प्रयत्न चालवला आहे ते संपूर्ण देशाने पाहिलेले आहे. अशावेळी अन्नदात्याला न्याय मिळणारच! राहता राहिला सवाल इलेक्ट्रॉनिक मीडियाचां तर अर्णव गोस्वामिचे न्यूज चॅनल कुत्रंही बघत नाही. तर उरलेल्या न्यूज चॅनल वाल्यांवर आता शेतकऱ्यांनी बहिष्कार घालावा. त्यांच्या गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, कुणीही न्यूज चॅनल बघणार नाही अशी व्यवस्था करण्यासाठी केबल ऑपरेटरवर दबाव आणावा. जेणेकरून एकदाका त्यांची टीआरपी घसरली की त्यांची कावडीचीही औकात राहणार नाही. सरकार त्यांना किती दिवस पोसणार आहे? कारण कुत्रा जोवर भुकण्याच्या किंवा दारात बांधण्याच्या लायकीचा असतो. तोवरच मालक त्याला हड्डी घालीत असतो, पण एकदाका त्याची उपयोगिता संपली की मग त्याची अवस्था धोबिका कुत्ता घरका ना घाटका अशी होते आज शेतकऱ्यांना खलिस्तानी ठरवणाऱ्या न्यूज चॅनल वाल्यांची तीच अवस्था होणार आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यावर म्हणे २ हजार रुपये टाकले आहेत आणि या २ हजाराच्या बदल्यात त्याने नव्या कृषी कायद्याला मान्यता द्यावी अशी सरकारची अपेक्षा आहे. पण सरकारच्या २ हजाराच्या बदल्यात आपला इमान आणि आई समान जमीन उद्योग पतींच्या घशात घालण्या इतका शेतकरी मूर्ख सुधा नाही आणि भिकारी सुद्धा नाही. त्याला आपलं बर वाईट कळत म्हणून तर तो आपला हक्क मागतोय. बरे नवा शेती कायदा आणायची शेतकऱ्यांनी मागणी केली नव्हती. तरीही सरकारने तीन कृषी विधेयके बहुमताच्या जोरावर संसदेत कशासाठी पास करून घेतली हे प्रसार माध्यमातील लोक सरकारला का नाही विचारत? बरे हा नवा कृषी कायदा करण्यापूर्वी इथल्या शेतकरी संघटनांशी सरकारने का नाही चर्चा केली? कॉन्ट्रॅक्ट फर्मिंग म्हणजे सरळ सरळ शेतकऱ्यांच्या जमिनीवर उद्योगपतींचा डाका. मात्र सरकार सांगतेय करार शेतकऱ्यांना मान्य नसेल तर ते न्यायालयात जाऊ शकतात. म्हणजे एखाद्या शेतकऱ्याची जमीन उद्योग पतीने कॉन्ट्रॅक्ट फरमिंगच्या माध्यमातून हडप केली, तर त्या शेतकऱ्याने न्यायालयात जावे आणि आयुष्यभर न्यायालयाच्या चक्र माराव्यात ! हा कुठला न्याय? जे इलेक्ट्रॉनिक मीडियावाले आज मोदींची तळी उचलून कृषी कायदा शेतकऱ्यांच्या हिताचा आहे असे सांगत आहेत, ते उद्या शेतकऱ्यांच्या जमिनी उद्योगपतींनी हडप केल्यास शेतकऱ्यांच्या मदतीला धावतील का? मग शेतकऱ्यांना खोटे ठरवून आणि सरकारची बाजू घेऊन त्यांना काय मिळणार आहे. या संपूर्ण प्रकरणात ते सरकारचे दलाल आहेत, हे पुन्हा एकदा सिद्ध झाल्याने आता देशवासीयांनी या दलालांपासून सावध राहायला हवे.

# महापालिका निवडणुकीत भाईगिरी

संध्या स्ट्रोक
सोनू जाधव

महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशा तीन पक्षांचे महा विकास आघाडी सरकार असले तरी प्रत्येक पक्षाला स्वतःचा जनाधार वाढवायचा असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात असा सूर प्रत्येक पक्षात उलटतोय. त्यासाठी महा विकास आघाडीमध्ये प्रत्येक पक्षाची भाईगिरी सुरू आहे. बहुतेक पुढील दोन महिन्यात राज्यातील १४ हजार ग्राम पंचायती सह मुंबई, कल्याण डोंबिवली, वसई विरार, औरंगाबाद आणि नवी मुंबई अशा ५ महानगर पालिकांच्या निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत भाजप विरुद्ध महा विकास आघाडी असा सरळ सामना झाला असता तर भाजपचे काही खरे नव्हते. पण महा विकास आघाडीतील तिन्ही पक्षांना स्वबळाची खुमखुमी आहे. त्यामुळे बहुतेक ठिकाणी ते स्वबळावर लढणार असेच दिसतेय आणि तसे झाले तर राजधानी मुंबई सह इतर ठिकाणीही त्यांना सपाटून मार खावा लागणार आहे. काँग्रेसची तर प्रादेशिक पक्षापेक्षही वाईट अवस्था होणार आहे. कारण राज्यातील त्यांची संघटनात्मक ताकत जवळपास संपुष्टात आलेले आहे. देशपातळीवर भलेही काँग्रेसला अध्यक्ष मिळत नसला तरी मुंबई काँग्रेसला मात्र भाई जगताप यांच्या रूपाने एक उमदा अध्यक्ष मिळाला आहे आणि भाईंनी मुंबई काँग्रेस अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून भाईगिरी सुरू केली आहे. त्यांनी मुंबई महानगर पालिकेची निवडणूक स्वबळावर आणि सर्व २२७ जागा लढवण्याची तयारी चालवली आहे. भाईंचा हा फाजील आत्मविश्वास त्यांच्या अध्यक्षपदावर गदा आणू शकतो. कारण गेल्या अनेक वर्षापासून मुंबई महापालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे. त्यामुळे मुंबईत काँग्रेसची आणि भाईंची डाळ शिजणार नाही. उलट शिवसेना आणि काँग्रेसमध्ये आणखी वीतुष्ट येऊन त्याचा परिणाम राज्यातील महा विकास आघाडी सरकारच्या स्थैर्यावर होऊ शकतो. वास्तविक भाईनी मुंबई काँग्रेसची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुंबईतील काँग्रेसची संघटनात्मक ताकत वाढवायला सुरुवात करायला हवी होती. कारण मुंबई काँग्रेसमध्ये गटातटाचे राजकारण आहे. मुरली देवरा विरूद्ध कृपा भैय्या यांनी त्यांच्या कारकिर्दीत मुंबई काँग्रेसची अवस्था भारत पाक सारखी केली होती ती आजही कायम आहे. आणि मराठी माणूस सहसा काँग्रेसला चालत नाही. निदान मुंबईत तरी मराठी माणूस नको हीच आजवर काँग्रेसची भूमिका होती. त्यामुळेच कृपा शंकर, संजय निरुपम यांच्या सारख्या भैय्यांना रान मोकळं मिळालं. या लोकांनी एकनाथ गायकवाड यांच्या सारख्या माणसाच्या मार्गात अनेक अडथळे आणले. जनार्दन चांदूरकर यांच्या सारख्या हुशार आणि कायदेतज्ञ माणसाला पुढे येऊ दिले नाही. त्यामुळे भाई जगताप यांची भाईगिरी मुंबई काँग्रेसमध्ये फार काल चालणार नाही. भाई सिद्धिविनायकाच्या दर्शनाला गेले होते हे जर सोनिया गांधी किंवा काँग्रेस मधल्या निधर्मी वादी बड्या नेत्याना समजले. तर भाईंची पंचायत होऊ शकते. काँग्रेसमध्ये अशी विचित्र परिस्थिती असताना भाईंनी स्वबळाची चाचपणी करणे म्हणजे उंटावरून शेळ्या हकण्यासारखे आहे. त्यापेक्षा महा विकास आघाडीमध्ये राहूनच शिवसेनेशी जुळवून घेत महापालिका निवडणूक लढवली, तर त्यात काँग्रेसचा फायदाच आहे. कारण काँग्रेसच्या हक्काच्या दलीत मुस्लिम मतदार संघात आता समाजवादी पार्टी, ओविसी यांची एमआयएम, वंचित आघाडी आणि आरपीआयचे किमान दोनशे गट येवढे सगळे वाटेकरी आहेत. त्यातून काँग्रेसच्या वाट्याला काय येईल याचा भाई जगताप यांनी विचार करायला हवा. शिवाय भाई जेंव्हा पालिकेच्या २२७ जागा लढायला मैदानात उतरतील तेंव्हा त्यांच्या मागे किती काँग्रेसवाले असतील हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. तेंव्हा हे सगळ पाहता भाईंची स्वबळाची भाई गिरी किती यशस्वी होईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

यावेळी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत खरा सामना आहे तो शिवसेना विरूद्ध भाजप! कारण मुंबई महापालिकेतून सेनेला कोणत्याही परिस्थितीत हद्दपार करण्याचा भाजपने चंग बांधलाय. त्यासाठी प्रसंगी इम्रान खानच्या तहरिक ए पाकिस्तान पक्षा बरोबर सुद्धा युती करण्याची भाजपची तयारी असेल. तर सत्ता टिकवण्यासाठी शिवसेना सुद्धा कोणत्याही थराला जाऊ शकते. मग अशा या महा संग्रामात भाईंच्या काँग्रेसचा कसा टिकाव लागेल. कारण त्यासाठी कार्यकर्त्यांची जी मजबूत ताकत लागते ती आज तरी मुंबई काँग्रेसकडे नाही आणि असली तरी वेगवेगळ्या गटात विभागली गेली आहे आणि या सर्व गटा तटांना ऐकात्र करणे वाटते तितके सोपे नाही. त्यामुळे भाई जगताप यांनी मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याचा विचारच करू नये तसे केले, तर पालिकेत काँग्रेसची आज जी काही थोडी फार ताकत आहे ती सुद्धा संपुष्टात येईल.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# हनी ट्रॅप नैतिक की अनैतिक?

दिशायन

हनी ट्रॅप तंत्राचा वापर पहिल्यांदा १९१७ साली पहिल्या वर्ल्ड वॉरमध्ये झाला. जर्मनमधील डान्सर मागरिथा गेर्ट्रुइडा या डच महिलेने हा सापळा अर्थात ट्रॅप रचला होता. फ्रान्सच्या लष्करी अधिकाऱ्याशी तिने शारीरिक आणि भावनिक संबंध प्रस्थापित केले. शत्रूपक्षाच्या गोटातून जर्मनीविरुद्धच्या कटाची माहिती काढली. हा पहिला हनी ट्रॅप म्हणून ओळखला जातो. यापूर्वीही हनी ट्रॅपची प्रकरणे घडली असतील मात्र त्याचा उल्लेख कोठे आढळत नाही. यानंतर लष्कर, गुप्तहेर यंत्रणा आदींमध्ये अशाप्रकारचे सापळे रचून लोकांना अडकवण्याची प्रथाच बनली.

जगातली सगळ्यात मोठी आणि बलशाली गुप्तचर यंत्रणा म्हणून मोसादला ओळखले जाते. मोसाद ही इस्राइलची गुप्तचर यंत्रणा आहे. मोसादनेच या ट्रॅपचा सगळ्यात प्रभावी वापर केला आहे. मोसादने जिहाद्यांची माहिती शोधण्यासाठी, अमेरिकेच्या लष्कराची माहिती काढण्यासाठी याचा वापर केला होता. पण त्यांचे काही ट्रॅप फसलेही आहेत. ज्यामुळे एका महिलेला १८ वर्षाचा तुरंगवासही भोगावा लागला. अशाप्रकारे सापळा रचून माहिती काढण्याचे तंत्र जगातले जवळपास सर्वच देश वापरतात. यात अनेक अधिकारी अडकलेसुद्धा आहेत. अगदी आपले भारतीय जवानसुद्धा अशा ट्रॅपमधे अडकले आहेत. किमान ५० सैनिक आणि अधिकारी यात अडकले असल्याचे समजते. कित्येकदा माहिती काढण्यासाठी हे लोक पत्रकार असल्याचेही खोटे सांगतात, असे द वॉशिंग्टन पोस्ट कंपनीचे मासिक फॉरेन पॉलिसीमधील माहितीवरुन समजते. हनी ट्रॅपमुळे देशांनी केलेले करार, लष्कराची माहिती, योजना इत्यादींची माहिती काढून देशावर वेगवेगळ्या प्रकारे हल्ला होतो. असे अनुभव सर्वच देशांना आल्यामुळे कोणत्याही लष्करी अधिकाऱ्याला फेसबूक किंवा व्हॉट्अपवर स्वत:ची ओळख उघड करण्याची परवानगी नसते. तसेच यासाठी काही मार्गदर्शक सूचनाही बनवण्यात आल्या आहेत. तसेच हनी ट्रॅप कसे लावतात, त्यामध्ये कशाप्रकारे अडकले जाऊ शकतो यावर प्रबोधन केले जाते, अशी माहिती फॉरेन पॉलिसीने दिली. हनी ट्रॅपमध्ये सुरुवातीपासूनच महिलांचा वापर होत आलाय. पण गेल्या दोन दशकात पुरुषांचाही यात भरणा आहे. आता समलिंगीसुद्धा अशा कटाचा भाग बनतात. आपण हे सिनेमातही पाहिले आहे. शाहरुख खानच्या डॉन' सिनेमात करीना कपूर, एक था टायगर'मधे कटरीना कैफ आणि सलमान खान, १६ डिसेंबर'मध्ये मिलिंद सोमण, कॉर्पोरेट'मधे बिपाशा बासू इत्यादी. हॉलिवूडमधे तर हनीट्रॅपच्या खऱ्या घटनेवरीलचा हनीट्रॅप नावाचा सिनेमाच २०१४ साली प्रदर्शित झाला होता. सध्या तो सिनेमा नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे. सध्या हनी ट्रॅप हा प्रकार सोशल मीडियावर सर्वाधिक वाढलाय.

अगदी कुणालाही यातून फसवले जाते. कुठलाही मोबाईल नंबर किंवा सोशल मीडिया अकाऊंट शोधून त्यावर स्वतःची जुजबी माहिती देणारा पहिला मेसेज टाकला जातो. कुतूहल म्हणून आपण रिप्लाय करतो. मग गोड बोलून जवळीक साधली जाते. प्रेमसंबंध निर्माण केले जातात. त्यातून गुप्त फोटो, व्हिडीओची देवाणघेवाण होते. मग यावरुन पुढे ब्लॅकमेल केले जाते आणि पैसे उकळले जातात. आपण व्हर्च्युअल जगात अगदी सावध राहिले पाहिजे. त्यासाठी अनोळखी माणसांशी चॅट करणे टाळा. वैयक्तिक माहिती पाठवू नका. कुणी सतत मेसेज करत असेल तर त्याला ब्लॉक करा. तरीही फसवणूक झालीच तर तत्काळ पोलिसांशी संपर्क साधा. कधी हे विकृत मानसिकतेतून होते तर कधी पैसे उकळण्यासाठी. हा गुन्हा असून त्यासाठी शिक्षा होऊ शकते. अनोळखी माणसाचा मेसेज आल्यानंतर शहानिशा केल्याशिवाय त्याला आपली माहिती देऊ नये. आपल्या फोटो किंवा पोस्टला अनोळखी माणसाने लाईक केल्यावर त्याच्याशी लगेच बोलू नका, असा सल्ला वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश बिराजदार देतात.

हनी ट्रॅपमधे ट्रॅप टाकणाऱ्या महिलांना एकाप्रकारे वेश्या व्यवसायात ढकलले जाते. गरीब, कमजोर कुटुंबातल्या मुलींना पैशांसाठी असे करण्यास भाग पाडले जाते. तर काहींना त्या त्या क्षेत्रात काम मिळवून देण्याचे आमिष दाखवले जाते. काही महिन्यांपूर्वी गाजलेल्या मध्य प्रदेशातल्या प्रकरणात काही गरजू मुली अडकल्या होत्या. तर काहींना राजकारणात काम करायचे होते. पक्षात मोठे पद देण्याचा किंवा निवडणुकीचे तिकीट देण्याच्या आमिषावरुनही त्यांना ट्रॅप केले आणि मग त्या महिलांनी दुसऱ्यांना ट्रॅप केले. यात अडकलेल्या ४० महिलांच्या चौकशी दरम्यान ही माहिती समोर आली होती. आपण एक वाक्य वेळोवेळी ऐकतो, वाचतो. 'युद्धात आणि प्रेमात सगळं काही माफ असते.' हे वाक्य जवळपास प्रत्येक भाषेत आहे. याचाच आधार घेत हनी ट्रॅपचा वापर केला जातो. पण शेवटी एक प्रश्न उरतोच, आपल्या विरोधी गटातली माहिती काढण्यासाठी वापरले जाणारे हनी ट्रॅप हे अस्त्र नैतिक आहे की अनैतिक?

# बल सागर भारत होवो...

**बल सागर भारत होवो, विश्वात शोभून राहो....**
**हे कंकण करी बांधियले, जनसेवे जीवन दीधले,**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिद्ध मरायाला हो!**

या ओळी आठवल्या तर एक प्रकारची फुर्ती स्फुरण येत असे आणि येतंय. पूजनीय श्री साने गुरुजी आत्मत्मीयतेने लिहले. त्यात जी आत्मीयता देशप्रेम देशाप्रती जी भावना वर्तवली भारताच्या उज्ज्वल भविष्याची त्यांच्या मनातील संकल्पना मांडली तीच ह्या देशातील सर्व तमाम जनतेला हवी अभिप्रेत आहे. स्वतंत्र मिळवण्यासाठी ज्यांनी आपली प्राणाहुती दिली ते क्रांतिकारी वीर सर्व महापुरुष स्वतंत्र पूर्वी होऊन गेलेले जन्मलेले साऱ्या जनतेच्या मनातील संकल्पना होती देश स्वतंत्र करून आपलं आपल्या जनतेचं राज्य निर्माण होऊन एक स्वतंत्र भारत निर्माण व्हावा आणि तो झालाही. स्वतंत्र निर्माण झाला पण स्वतंत्र संकल्पना तद नंन्तर फारशी रुजली नाही नेते राजकारणी नोकरशाहीत.सामान्य जनते विषयी आस्था नाही पण पोपट पंची करून कुठंही कशीही सत्ता मिळवण्यासाठी राजकारण करू लागलीय गल्ली ते दिल्ली हेच चित्र. साम, दाम, दंड, जातीयभेद सारं तंत्र जनतेवर वापरून ग्रामपंचायत असो वा विविध संस्था ते विधानसभा, लोकसभा, विधानभवनपर्यंत सत्ता मिळवण्यासाठी राजकारणी झुजतांना पाहते जनता. देशानं प्रगती केली पण वैचारिक पातळी वर अधोगती सारखंच झालं भ्रष्टाचार अराजकता जनतेला ओरबाडणे जनतेची कामं न करणे वर्षो न वर्ष प्रलंबित मागण्या प्रश्न न सोडवणं आलेला कागद वजन ठेवल्या शिवाय पुढे सरकत नाही. नाही वजन असलं तर तो कागद तेथेच जीर्ण होऊन फाटतो पण त्या कागदाला किंमत दिली जातं नाही. भ्रष्ट सरकारी यंत्रणा यांचे प्रताप दिवसा गणिक वाढताय पण कमी होण्याचं नाव घेतं नाहीत. पन्नास पन्नास वर्ष दाद मिळतं नाही प्रश्न सुटत नसतील तर काय उपयोग. पिढी जाते दुसरी येते पण प्रश्न तसेच शिल्लक. हाच का बलशाली भारत या स्वतंत्र पूर्वीचे क्रांतिकारक विचारवंन्त महापुरुषांना अभिप्रेत होता? कुठं फेडाल पाप वरती गेलेले महापुरुष क्रांतिकारी तळमळत विव्हळत असतील. याच साठी दिले का बलिदान का रक्त सांडलं आपलं हा प्रश्न स्व मनाला विचारत असतील कदाचित असंच वाटतं. असेल त्यांना भारतात अंनत क्रांतिकारी असे झालेत जे इतिहासाच्या पानात सापडत दिसतं नाहीत. देशा साठी ज्यांनी सर्वस्व अर्पण केलं ते पण येथे भाकरी साठी वणवण फिरतांना भटकले असतील येथे. त्यांची साधी दखल घेतली गेली नाही अदृश्य राहिलेत येथे असं वाटतं. इतिहासातील सत्पुरुष आजच्या भारताला पाहून अश्रू गाळत असतील. येथे तर मला वाटतं एक पण महापुरुष असा पाहिला गेला नाही अगोदर त्याची जात पाहिली जाते सर्व जातीधर्मात त्यांना जोखडून ठेवलं जातंय. हि मोठी शोकांतिका आहे. एकसंग भारतात एकसंग लोकं नाहीत सारी सारी संकुचित मानसिकतेत अडकली देशाप्रती प्रेम सर्वांना आहे पण देशातील लोकं एकमेकांना चालत नाहीत.

आजचं सारं जे चाललंय ते अगोदरच समजलं असेल स्वतंत्र भारतातील जनता कोणत्या मार्गानं चाललीय हेच पाहून उत्कृष्ट रचनाकार सोज्वळ भावनिक देशप्रेमी क्रांतिकारी गुरुजीनीं अगोदरच समाधी घेतली असावी. त्यांच्या जयंती दिवशी लिहावे वाटले चुकलं असेल तर त्या अन त्यांच्या सारख्या महान आत्म्यांची मी माफी मागतो. पण आता दृष्ट, भ्रष्ट, जी वागत असतील त्यांना क्रांतिकारकांचे स्वप्नं भंग करणार्यांना क्रांतिकारक कदापि ते माफी देणार नाहीत.

**- प्रदीप मनोहर पाटील**
गणपूर ता. चोपडा जिल्हा जळगाव
मोबाईल. ९९२२२३९०५५

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:12 PM Page 1



# सोलापूर येथे बनावट सिम कार्ड विक्री करणारी टोळी जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरात बनावट कागदपत्रांच्या आधारे मोबाईल सिमकार्ड खरेदी विक्री करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात आली त्यांच्याकडून ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सोलापूर शहरात अवैध धंदे करणाऱ्यांना दुसऱ्याच्या नावाने असलेले सिमकार्ड विक्री होत असल्याबाबत सायबर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात भादंवि ४०६, ४२०, ४६३, ४६८, १२०(ब),३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपास केला असता गोपाल संजय मुंदडा (२१) हा त्याच्या बलिदान चौक शिवगंगा मंदिराजवळ येथील खाऊ घर जनरल स्टोअर्स मधून जनरल माल विक्रीसोबतच विविध सेल्युलर कंपनीच्या (आयडिया, जिओ, एअरटेल, वोडोफोन, बीएसएनएल) सिमकार्डची विक्री करून ऍक्टिवेशन करीत होते. त्या अनुषंगाने दुकानावर विविध सेल्युलर कंपन्यांचे जाहिरात पत्रक, पोम्प्लेट्स, रिचार्ज प्लॅन बोर्ड दर्शनी भागावर लावलेली आहेत. सिमकार्ड खरेदीसाठी ग्राहक आल्यानंतर त्यांच्याकडून ओळखपत्र व रहिवासी पुराव्याची कागदपत्रे घेऊन सदर ग्राहकांचा फोटो ही विशिष्ट मोबाईलमध्ये जात व ग्राहकांना संबंधित कंपनीचे सिमकार्ड कार्यान्वित करून देण्यात येत असे. त्याबाबत त्यास विशिष्ट असे कमिशन संबंधित सेल्युलर कंपनीकडून मिळत असे. सदर जनरल स्टोअर्सचा मालक मुंदडा हा विविध बहाण्याने अजून एकदा ग्राहकांचा फोटो घेऊन व त्यांचाच कागदपत्रांचा गैरवापर करून ग्राहकांच्या नावावर अजून सिमकार्ड कार्यान्वित करीत असे व जादा दराने तो इतर आरोपींना विकत असे. या सीमचा वापर अवैध धंदे करणाऱ्याकडून केला जात असे. मुंदडा याच्याकडून दुसऱ्याच्या नांवे असलेले सिमकार्ड विकत घेणाऱ्या राजेंद्र नागनाथ मल्लूर (३७), स्वामी दुर्गा वरगंटी, कमलकिशोर नंदकिशोर अट्टल (३८), नागेश सुभाष येळमेली (३२), महांतय्या गुरय्या स्वामी (३२), अशा एकूण सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीकडून ७५ हजार रुपयांचे एकूण १३ मोबाईल फोन व वेगवेगळ्या मोबाईल कंपनीचे १२ सिमकार्ड जप्त करण्यात आली आहेत.

बनावट कागदपत्रांच्या आधारे कार्यान्वित केलेले सर्व सिमकार्ड हस्तगत करण्याचे काम सुरू असून सिमकार्ड वापरणारे सर्व आरोपी निष्पन्न करून त्यांना अटक करण्यात येत आहे. सिमकार्ड आणखी कोणकोणत्या अवैध धंदे करिता वापर केला का याचा तपास सुरू आहे. ही सदर कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक विरेंद्रसिंग बायस, नागेश होटकर पोलीस हवालदार श्रीरंग कुलकर्णी, पोना सचिन गायकवाड, पोना संतोष येळे, बाबू मंगरुळे, पोशि वसीम शेख, अर्जुन गायकवाड, अमोल कानडे, करण माने यांनी पार पाडली आहे.

## नागरिकांना आवाहन

**नागरिकांनी सिमकार्ड विकत घेत असताना खबरदारी घेऊन आपली कागदपत्रे योग्य कारणाकरिता स्कॅन होत आहे अगर कसे? याबाबत सविस्तर पडताळणी करावी आपण कागदपत्रे कोणत्या कारणाकरिता देत आहोत ते कारण लिहावे असे सायबर पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर यांच्यावतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.**

### प्रयोगशील शेतकऱ्यांसाठीच्या पुरस्कारांमध्ये वाढ

# ६३ ऐवजी ९९ पुरस्कारांनी शेतकऱ्यांना सन्मानित करणार -कृषिमंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी**

शेतीमध्ये नवनविन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनासाठी कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची संख्या वाढविण्यात आली असून आता ६३ ऐवजी ९९ पुरस्कार दरवर्षी दिले जातील. या वर्षापासून 'युवा शेतकरी' आणि 'शास्त्रज्ञांसाठी कृषी संशोधक' या नव्या पुरस्कारांचा समावेश करण्यात आला असून काही पुरस्कारांचे निकष बदलण्यात आल्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. राज्य शासनामार्फत सन १९६७ पासुन कृषिक्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीबद्दल विविध पुरस्कार देण्यात येतात. यामध्ये पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, जिजामाता कृषिभुषण पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभुषण पुरस्कार, सेंद्रिय शेती पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार व शेतिनिष्ठ या पुरस्कारांचा समावेश आहे.

कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या पुरस्कारांसाठी पात्रतेचे निकष बदलण्याबरोबरच त्यांची संख्या वाढविण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये तरुण शेतकऱ्यांना वाव देण्यासाठी नव्याने 'युवा शेतकरी पुरस्कार' व उत्तम काम करणाऱ्या शास्त्रज्ञांचा सन्मान करण्यासाठी उत्कृष्ट कृषि संशोधक' पुरस्काराचा समावेश करण्यात आला आहे. पुरस्कारांच्या निकषांमध्ये बदल करून निवड आणि शिफारशी बाबतच्या कार्यपध्दतीत सुधारणा आणि एकसुत्रीपणा येण्यासाठी बदल करण्यात आल्याचे दादाजी भुसे यांनी सांगितले.

यापूर्वी कृषी विभागामार्फत एकूण ६३ पुरस्कार देण्यात येत होते. त्यात काही पुरस्कारांची संख्या वाढवून नव्याने ३६ पुरस्कारांची वाढ करण्यात आली असून आता ९९ पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सर्व विभागातुन व सर्व जिल्ह्यातून शेतकरी निवडले जातील याची खबरदारी घेण्यात आली आहे. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार १, जिजामाता कृषिभुषण पुरस्कार- ८, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारांची संख्या ५ वरून ८ करण्यात आली आहे.

सेंद्रिय शेती पुरस्कार ८, उद्यान पंडीत पुरस्कार ८, शेती मित्र पुरस्कार ३ वरून ८ करण्यात आले असून शेतीनिष्ठ पुरस्कारांची संख्या २५ वरून ४० करण्यात आली आहे. सेवारत्न पुरस्कार २ वरून ९ करण्यात आले तर नव्याने समावेश करण्यात आलेला युवा शेतकरी पुरस्कार ८ जणांना दिला जाईल. उत्कृष्ट कृषि संशोधक पुरस्काराची संख्या १ आहे.

# अवैध धंद्याविरोधातील कारवाई तीव्र करणार विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अवैध धंद्याविरोधातील कारवाई आणखी तीव्र करण्याबरोबरच समाजाभिमुख पोलिसिंग करण्यावर आपला भर राहील, असे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी व्यक्त केले. बुधवारी पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना मनोज लोहिया बोलत होते. यावेळी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते. कोरोना काळात अनेक प्रशासकीय कामे रखडले होते. त्यासाठी सोलापूर दौऱ्यावर आल्याचे सांगून लोहिया म्हणाले, कोरोना काळात महानगरातून सोलापूर ग्रामीणमध्ये सुमारे ३. ५० लाख नागरिक स्थलांतरित झाले होते. त्यामुळे काही प्रमाणात गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर महसूल प्रशासनाच्या माध्यमातून यापुढेही कारवाई सुरूच राहणार आहे. महसूल विभागाला कारवाईसाठी पोलिसांची मदत घ्यावी लागते. ती आम्ही देत राहू असेही ते म्हणाले, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर नियंत्रण आणण्यासाठी क्यूआर कोड व ऍपची मदत घेण्यात येणार आहे. समाजातील एकूण गुन्हे कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये जेष्ठ नागरिकांशी संवाद व शाळेमध्ये

जाऊन समुपदेशन करण्यात येणार आहे. महिला व बालकांवरील अन्याय अत्याचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले, अलीकडे सायबर क्राईम वाढत असून त्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्ररित्या सायबर पोलीस स्टेशन स्थापन करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाची मदत घेऊन आर्थिक फसवणूक करणाऱ्याविरोधात कारवाई करण्यात येईल. माझा व्यवस्थेवर पूर्ण विश्वास असून समाजाभिमुख पोलिसिंग करण्यावर आपला भर राहील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तत्पुर्वी मनोज लोहिया यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या बैठकीत काही अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांना चांगलेच धारेवर धरल्याचे सूत्रांकडून समजले जाते.

# परराज्यातून धान विक्रीसाठी आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे -उपमुख्यमंत्री

### सरकारचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी धानखरेदी प्रक्रियेवर करडी नजर ठेवण्याच्या सूचना

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्य सरकारने सुरु केलेली धानखरेदी केंद्रे ही आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी असून या केंद्रांवर परराज्यातले धान विक्रीसाठी येऊ नये, त्यातून राज्याचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी छत्तीसगड, मध्यप्रदेश, तेलंगणासारख्या परराज्यांच्या सीमांवरील नाक्यांवर कडक तपासणी मोहिम राबवावी. परराज्यातून किंवा व्यापाऱ्यांकडून राज्यातील केंद्रांवर अवैध मार्गाने धान विक्रीसाठी आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नागपूरचे विभागीय आयुक्त, पोलिस महानिरिक्षक, संबंधित चार जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षकांची बैठक आयोजित केली. बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, गृहमंत्री अनिल देशमुख, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती, पणनचे प्रधान सचिव अनुपकुमार उपस्थित होते. नागपूरचे विभागीय आयुक्त संजीवकुमार व संबंधित जिल्हास्तरीय अधिकारी व्हीसीद्वारे सहभागी झाले होते. राज्याच्या तिजोरीवर कोरोनामुळे ताण असतानाही राज्यातील शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी राज्यात

खरीप व रब्बी हंगामासाठी धानखरेदी योजना सुरु आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीसह प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. महाराष्ट्रात धानाचा दर जास्त असल्याने परराराज्यातील शेतकरी आणि व्यापारी पूर्व विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांतील केंद्रांवर अवैध मार्गाने धान विक्रीसाठी आणतात. हे धान खरेदी केल्यास सरकारचे आर्थिक नुकसान वाढण्याची शक्यता या पार्श्वभूमीवर यावेळी राज्यातील धान खरेदीचा आढावा घेण्यात आला धान विक्रीसाठी आणणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही श्री.पवार यांनी दिले. अवैध धानवाहतूक करणारी वाहने जप्त करावीत. धानाच्या नोंदी काटेकोर व्हाव्यात, परराज्यातील धान राज्यात येणार नाही यासाठी संबंधित विभागीय आयुक्त व पोलिस महानिरिक्षकांनी भरारी पथके नेमून आवश्यक कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, धान खरेदी केंद्रावर फक्त राज्यातील शेतकऱ्यांचेच धान आले पाहिजे. धानाचे ट्रक भरुन येत असतील तर त्यांची तपासणी व चौकशी झालीच पाहिजे. खरेदी केंद्रावर खराब, रंगहिन, ओले, कोंब फुटलेले, अपरिपक्व, भेसळयुक्त धानाची खरेदी झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

खरेदी केंद्रांवर धान न आणता नोंदी करण्याच्या गैरप्रकारांवर कारवाई करावी. केंद्रावर खरेदी झालेलं धान भरडाईसाठी मिलवर गेलच पाहिजे. भरडाई करणाऱ्या मिल प्रत्यक्ष चालू असल्या पाहिजेत. मिल बंद आणि कागदोपत्री तांदूळ तयार; अशा कागदोपत्री नोंदी खपवून घेतल्या जाणार नाहीत. सर्व खरेदी केंद्रे, जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील गोदामे व मिलच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत व त्यांचे लाईव्ह परीक्षण केले जावे, असे निर्देशही अजित पवार यांनी दिले. नागपूर महसूल विभागातील खासगी गोदामांवर देखील करडी नजर ठेवावी. जूना खराब तांदूळ, किडलेला तांदूळ शासनाच्या माथी मारुन नवीन हंगामातला दर्जेदार तांदूळ हडप करण्याचे गैरप्रकार हाणून पाडावेत, असे स्पष्ट निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाने धान खरेदी केल्यावर ताबडतोब शेतकऱ्यांच्या खात्यावर रकमा ऑनलाईन जमा करण्याची कार्यवाहीही तात्काळ झाली पाहिजे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

# भारतरत्न अटल बिहारी वाजपेयींच्या जयंतीनिमित्त ग्रामीण रुग्णालय उदगीर येथे भाजपातर्फे फळे वाटप

**देवणी/प्रतिनिधी**

भारतरत्न, भारतीय जनता पक्षाचे संस्थापक अटल बिहारी वाजपेयी यांची २५ डिसेंबर रोजी जयंती निमित्त उदगीर शहर भारतीय जनता पक्षातर्फे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी विविध कार्यक्रम घेऊन स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. उदगीर शहर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष उदयसिंह ठाकूर यांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालय उदगीर येथे रुग्णांना फळे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला तसेच राजगिऱ्याचे लाडू ही यावेळी सर्वांना वाटप करण्यात आले. या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, उपनगराध्यक्ष सुधीर भोसले, ज्येष्ठ नगरसेवक मनोज पुदाले, माजी उपसभापती रामदास बेबंडे, भाजपा जिल्हा सचिव तथा नगरसेवक गणेश गायकवाड, अड दत्ता पाटील, राजकुमार मुक्कावर, रामेश्वर पवार, आनंद बुदे, शहर सरचिटणीस आनंद साबणे, सुरज हंडरगुळे, जिल्हा उपाध्यक्ष विकास जाधव आदि उपस्थित होते.

## शिवसेनेचे कैलास सोनटक्के यांचे निधन

वाडा : शिवसेनेचे वाडा उपतालुका प्रमुख कैलास वसंत सोनटक्के यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि.२५) दुःखद निधन झाले. सोनटक्के यांच्यावर मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू होते, उपचारादरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले आहे. अत्यंत हुशार राजकारणी व समाजकारणी, उच्च शिक्षित, राजकीय व सामाजिक जाण असणारा तसेच नेहमी हसतमुख असणारा कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या कैलास सोनटक्के यांना विविध माध्यमातून श्रद्धांजली वाहिली जात आहे.

# मनुस्मृती दहन दिन अंधार युगाचा अंत...!

२५ डिसेंबर मनुस्मृती दहन दिन! भारतातील समस्त स्त्रियांच्या जीवनातील अंधारयुगाचा अंत करणारा हा दिवस. जो आनंद १५ ऑगस्ट साजरा करताना होतो तोच आनंद आम्हाला २५ डिसेंबर साजरा करताना होतो. स्त्रीस्वतंत्र्याची प्रकाश पहाट म्हणजे मनुस्मृती दहन दिन होय!

प्राचीन काळी भारतात स्त्रियांचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ होता. अर्वाचीन काळात मात्र तो घसरला. मनुपुर्व काळात स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ होता. हिंदू धर्मातील मनुस्मृती नामक ग्रथांत मनूने स्त्री व शुद्रासाठी सर्वच स्तरावर अत्यंत जाचक व घ्रणास्पद अशा बंधनकारक अटी लादल्या. अटी इतक्या जाचक होत्या की मनु किती विक्रत होती हे स्पष्ट पणे जानवते. मनुस्मृती म्हणजे अंधार होय! अंधारात वय नसत, आकार नसतो तो एक भयंकर रूप आसते . त्यातून जन्माला येणाऱ्या गुलमगिरीचा अंधार तर महाभयानकच! कारण प्रकाश हाजारो वर्ष तिथे पोंहचलाच नाही. स्त्री आणी शुद्रातिशुद्रांच्या शहाणे होण्याच्या विवेकी होण्याच्या सर्व वाटा जिथ संपल्या त्या अंधाराच नाव मनुस्मृती...!

काय म्हणणे होते या अंधाराचे...! का राग होता या अंधाराचा समस्त स्त्रिया व शुद्रावर...! याच उत्तर शोधताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांती आणी प्रतिक्रांती वरील इतिहासाचा आधार घ्यावा लागला. डॉ. बाबासाहेबांच्या मते स्त्रिया आणी शुद्रांचा मोठा प्रवाह आर्य समाजातून बुध्द धम्माकडू सतत वाहू लागला. हे दोन घरमच आर्य समाजाचे आधारस्तंभ होते. स्त्रीया व शुद्रांच्या मोठ्या प्रमाणातील धर्मातरामुळे आपल्या समाजाचा डोलारा कोसळणार की काय? हि भिती निर्माण झाल्याने मनूने विक्रत नियमांची अन्यायकारक मनुस्मृती लिहली.

वर्चस्वाची ताकद मोठी असेल आणी ज्ञानाचे मार्गाच बंद आसतील तर तुम्ही गुलाम व्हायला वेळ लागत नाही.हिंदू धर्माने या दोन्ही गोष्टी साम – दाम – दंड– भेद या सर्व मार्गानी हाजारो वर्ष आवलंबिवल्या पर्यायाने स्त्री व शुद्रांना गुलाम बनविणे सोपे गेले. आपले गुलाम आसणाऱ्या वर्गाने शहाणे होणे हे आपल्या वर्चस्वाला धोकादायक आहे. त्यासाठी त्यांच्यावर वरचेवर अनंत अन्याय करीत राहणे, त्यांच्या अर्थाजनाची सर्व साधने काढून घेणे, ते सक्षम असुनही सतत परावलंबी कसे राहतील याकडे सर्वाधिक लक्ष देणे या गोष्टी केल्या गेल्या. भारताच्या इतिहास पटलावर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय होणे हे अनेक अर्थानी पिडीत, शोषित, वंचित स्त्री – शुद्रांना दिलासा देणारा ठरले. त्यांचे संपूर्ण जिवनच मनुस्मृतीच्या कल्याणासाठी खर्ची पडले आहे. हिंदू धर्मातील मनुस्मृती ही एखाद्या असाध्य रोगासारखी बहूजनांचे, स्त्रीयांचे, शुद्रातिशुद्रांचे शोषण करीत आहे. व हे शोषण हिंदू धर्माचे भरण पोषण करीत आहे. हे या ज्ञानाच्या राजाला फारच लवकर लक्षात आले.

२५ डिसेंबर १९२७ साली एका अस्पृश्य बैराग्याच्या हास्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या महाड सत्याग्रह परीषदेत मनुस्मृतीचे दहन हा तत्कालीन परस्थितील सनातनी धर्ममार्तडांना फार मोठा धक्का होता. समाजातील फार मोठ्या वर्गावर हाजारो वर्षापासून अलिखीत मालकी गाजवीण्याचा लिखीत परवाना आसलेली मनुस्मृती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीरपणे दहन केली होती. जो विचार कुणीही व्यक्ती मनातल्या मनातही करू शकत नव्हता ती क्रती डॉ. बाबासाहेबांनी जाहीरपणे केली. विशेष म्हणजे त्यावेळी डॉ. बाबासाहेब आवघ्या ३६ वर्षाचे होते.या क्रतीकडे डॉ. आंबेडकरांनी स्त्रियाच्या पारतंत्र्याला सर्वाधिक जबाबदार असलेली मनुस्मृती म्हणून पाहीली. तिचे दहन करून तिच्या जागी एक नवीन संहीता अशी असावी ज्यात स्त्रीयांना स्वतंत्र्य, समता आणी मानाचे स्थान असेल हे विचारा डॉ. बाबासाहेबांना स्वस्थ बसू देत नव्हते.. हेच कारण होते की, जेंव्हा भारतीय राज्यघटना निर्मीतीचे महान कार्य करताना त्यांनी स्वतंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारित राज्यघटना निर्माण केली.

हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी भारतातील समस्त स्त्रीयांना एक मैल्यवान दागीना दिला आहे. भारतातील प्रत्येक स्त्रीला तो धारण केल्यानंतर अभिमान वाटावा या पध्दतीने त्यांनी हिंदू कोडबिलाची निर्मीती केली आहे. हिंदू धर्माने भारतीय स्त्रीला अनंत दुःख, यातना एवढच नव्हेतर पशुपेक्षाही हीन वागणूक दिली. मनुचा अमानुष कायदा मोडीत काढणाऱ्या डॉ. बाबासाहेबांनी मात्र नेहमीच स्त्रीयांचा आदर केला आहे. मनुस्मृतीचे दहन आणी हिंदूकोड बिलाची निर्मीती यातूनच ते वारंवार दिसून येते. स्त्री मध्ये दडलेली शक्ती ते जाणून होते. स्त्रीयांच्या भावनांचा त्यांनी सुक्ष्मपणे विचार केला. माता रमाबाईनां लिहलेल्या एका पत्रात डॉ. बाबासाहेब म्हणतात मी स्त्री मुक्तीसाठी व स्त्री उन्नतीसाठी लढणारा एक योध्दा आहे. स्त्रीयांची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी आवश्यक जो संघर्ष केला त्याचा मला सार्थ अभिमान आहे. खरतर माणूस म्हणून आमचा विचार करणाऱ्या आणी राज्यघटनेच्या माध्यमातून आमचा सर्वतोपरी विचार करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेकरांचा आम्हाला अभिमान वाटतो. या देशात अंधाराला प्रकाश म्हणण्याची सक्ती हिंदू धर्माकडून हाजरो वर्ष झाली.वर्ण श्रेष्ठत्वाची सगळी सुत्रे हाती घेतलेल्या हिंदू धर्मातील एकही पढीक विद्वानाला स्त्री व शुद्रावर मनुस्मृती मधून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडाविशी वाटली नाही.

**– प्रा. शंकर सोनवणे**

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:13 PM Page 1



पान १ वरून....

## भलतेच करून ती निरस्सीम प्रेमाला ...

हिला आपल्या अंगाखाली घेतो असे बघणाऱ्याला होत होते. तिची ती दोन टपोरी कबुतरे ती मुद्दामच अनेकांना आपल्या साडीच्या पदराआडून दाखवत होती. ती तामीळनाडू येथून आता बंगळूर येथे येऊन राहिली होती. ती एका लेडिज हॉस्टेलमध्ये नर्सचे काम करत असतानाच तिची ओळख प्रभू नावाच्या तरूणाबरोबर झाली. प्रभू हा चेन्नईमधील एका हॉटेलमध्ये कुक म्हणून काम करत होता. सन २०१७ मध्ये तो तेथे काम करत असताना त्याने एक चुकीचा नंबर आपल्या मोबाईलवरून डायल केलेला होता. आणि तो नंबर अश्विनीला लागलेला होता. त्यावेळी त्याचे बराच वेळ ओळख नसतानाही बोलणे झालेले होते. त्यातूनच त्याची अश्विनीशी ओळख झालेली होती. ती घटस्फोटीत आहे आणि ती नवऱ्यापासून विभक्त राहत आहे याची कल्पना त्याला आलेली होती. त्यानंतर ते दररोज भेटत होते. तिच्या मादक आणि सेक्सी फिगरवर तो भलताच लट्टू झाला होता. त्याला ती आवडू लागली होती. त्या दोघांची दररोज भेट होत होती. ते दोघे ही एकमेकांच्या प्रेमात पडले होते. त्या दोघांचे प्रेम बहरत असताना ती त्याच्याशी लग्न करून संसार थाटू इच्छित होती. तो मात्र तिची जवानी उपभोगून तिला सोडून देवू इच्छित होता. त्या दोघांचे शारीरीक संबध ही आले होते. एका तो तिच्याबरोबर काम करत असताना ती त्याच्या अंगावर नागडी पडली होती.तो ही पूर्णपणे नग्नच होता. अश्विनी ही कोवळ्या काकडीसारखी असल्याने तिची जवानी उपभोगताना तो कुठे तरी कमी पडत होता. एकाच शॉटमध्ये दमलेला असल्याने तो तसाच नग्न पडून होता. ती ही त्याच्या अंगावर पडून होती. तिची मात्र कामभावना अजून शांत झालेली नव्हती. तिला त्याच्याकडून पाहिजे तसे शारीरिक सुख भेटत नव्हते. तरीही ती गप्प होती. ती त्याला त्या कामासाठी उत्तेजीत करत असताना तो मात्र थंड होता. याचे कारण तिने त्याला विचारल्यावर त्याने तिला भलतेच उत्तर दिले होते. त्यावेळी तो तिला म्हणाला, माझी कामभावना ही एकाद्या महिलेला, मुलीला नग्न बघितले, तिची ती कोवळी राणी बघितली तरच माझी कामभावना जास्त पेटते. यावर ती त्याला म्हणाली, मग मी काय करू, त्यावर त्याने तिला एक वेगळाच मार्ग सुचवला होता. तो तिला म्हणाला, तु ज्या खाजगी रूग्णालयात नर्स म्हणून काम करतेस त्या रूग्णालयाचे मोठे लेडिज हॉस्टेल आहे. त्या हॉस्टेलमधील मुलीचे नग्न मला माझ्या मोबाईलमध्ये व्हिडीओ तयार करून पाठव. प्रियकराची ही अजब मागणी ऐकून ती विचारात पडली होती. दिसायला ती सेक्सी, मादक होती. तिला नग्न बघून कुठल्याही नपुंसक पुरूषाची कामभावना होत होती. पण प्रियकराला तिने आपले शरीर देऊन सुध्दा त्याने केलेली विचित्र मागणी एकून तिच्या पायाखालची वाळूच सरकली होती. तिला काय करावे आणि काय नको असे झाले होती. त्याने तिची कामभावना थंड केली नव्हती. तिला मात्र खाज सुटल्याने ती त्याला आपल्या अंगावर ओढून घेऊ लागली होती. तो मात्र तिच्यासमोरच आपले सामान हातात घेऊन मास्टरब्रेशन करू लागला होता. त्याला सेक्सच्या बाबत ती अजबच सवय जडलेली होती हे तिला त्यावेळी समजले होते. तिचा प्रियकर नपूंसक नव्हता. त्याला कामभावना होत होती. परंतु तो ज्यावेळी एकाद्या महिलेला उपभोगत असायचा तिच्याबरोबर काम करत असताना त्याची कामभावना थंड पडू लागली की, त्याला मोबाईलमधील नग्न महिलांचे आश्लिल व्हिडीओ पाहायची सवय जडलेली. त्याशिवाय त्याचे काम ही होत नव्हते. ही गोष्ट ज्यावेळी आश्विनीला समजली तेव्हा तिने आपल्या कपाळावर हात मारून घेतला होता. ती त्याला म्हणाली, तुझ्यासमोर एवढा जवानीचा खजिना खुला असताना तुला दुसऱ्याची जवानी दिवानी कशाला पाहिजे. परंतू त्याने तिला लग्न करायचे असेल तर माझ्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागेल, मी सांगेन तसे करावे लागेल अशी अट घातली. त्यावर ती काय बोलली नाही. एकदा तिने तिच्या नवऱ्यापासून धोका खाललेला होता. ती परत धोका खाऊ इच्छित नव्हता. प्रभू ने ही तिला लग्न करतो असे खोटे आश्वासन दिलेले होते. ती त्याच्या आश्वासनला बळी पडली होती. तिला त्याच्याबरोबर कोणत्याही परिस्थिती लग्न करायचे असल्याने त्याने केलेली मागणी तिला पूर्ण करावेसे वाटत होते. म्हणून आलिकडे आपल्या हॉस्टेलमधील मुलीचे महिलांचे त्या आंघोळ करत असतनाचे, त्या कपडे बदलतानाचे व्हिडीओ चित्रण करून त्याच्या किल्प चोरून तयार करत होती. आणि त्या अश्लिल किल्पा ती प्रियकर प्रभू याला पाठवत होती. त्या किल्पा बघून तो मास्टरब्रेशन करत होता. आणि आपली कामभावना शांत करत होता. त्याचा हा प्रकार जवळपास दीड ते दोन वर्ष चालला होता. तिने आतापर्यंत बऱ्याच जणींचे अश्लिल व्हिडीओ किल्पा तयार केल्या होत्या. त्या किल्पा ती त्याला पाठवून देत होती. त्याचे तो पुढे काय करतो हे तिला माहित नव्हते. तो सांगेल तेवढेच ती करत होती. गेल्या ५ डिसेंबर २०२० रोजी ती त्या हॉस्टेलमध्ये एका मुलीचे आंघोळ करतानाच व्हिडीओ तयार करत असताना तिला त्या हॉस्टेलच्या गार्डने पाहिलेले होते. त्यावेळी त्या गार्डने तिला याविषयी विचारले असता तिची तारबळा उडली होती. तिच्या हातात मोबाईल होता. ती काय चित्रण करत आहे याची गार्डला कल्पना आलेली होती. म्हणून त्याने त्यावेळी तिच्याकडून तो मोबाईल हिसकावून घेतला त्यावेळी त्या मोबाईलमध्ये त्या हॉस्टेलमधील एक मुलगी नग्न आंघोळ करतानाचे चित्रण होताना दिसत होते. त्याने लगेचच ही कल्पना त्या हॉस्टेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानां दिली. त्यांनी तिला बोलावून घेऊन याचा जाब विचारला असता तिने आपली चूक मान्य केली. त्या हॉस्टेलच्या वरिष्ठ आधिकाऱ्यांनी आपल्या हॉस्टेलमध्ये चाललेल्या प्रकाराबद्दल लगेचच पोलीसांना कल्पना देवून या घटनेची माहिती दिली. पोलीसांनी आश्विनी हिला ताब्यात घेऊन तिच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तिने पोलीसांना माहिती दिली की, ती त्या हॉस्टेलमधील मुलीचे नग्न अश्लिल व्हिडीओ तयार करून ती आपला प्रियकर प्रभू याला पाठवत होती. ती त्याच्याशी लग्न करू इच्छित असल्याने आणि तो तिच्याशी लग्न करण्याचे टाळाटाळ करू लागल्याने याच्यासाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याने ती तो सांगेल त्याप्रमाणे करत होती. त्यानेच तिला तिच्या हॉस्टेलमधील मुलीचें महिलांचे अश्लिला व्हिडीओ तयार करण्यास सांगितले आणि तिने तसे केले तरच तो तिच्याशी लग्न करणार असल्याने तिने हे कृत्य केले. या घटनेचा पोलीस उपायुक्त (व्हाईटफिल्ड) डी.देवराज यांनी जलद तपास करून तिचा प्रियकर प्रभू याला ताब्यात घेण्याच्या सुचना पोलीसांना दिल्या होत्या. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने ही आपला गुन्हा कबुल केला होता. पोलीसांनी त्या दोघांचा मोबाईल जप्त करून त्यातील मेमरी कार्ड तपास करण्यास सुरूवात केली. यावेळी अश्विनीने त्याला पाठवलेले त्या महिलांचे अश्लिल व्हिडीओ प्रभू याने दुसरीकडे पाठविलेले नव्हते. पोलीसांना असा एक अंदाज होता की, या दोघांनी त्या हॉस्टेलमधील महिलांचे ते अश्लिल व्हिडीओ सोशल मिडियाच्या प्लॅटफार्मवर अपलोड करून त्या महिला मुलांना ब्लॅकमेल करीत असावे पण तसे काही त्या दोघांनी केलेले नव्हते. पोलीसांनी केलेल्या आधिक चौकशीत प्रभू हा लैंगिक विकृतीने पछाडलेला होता. त्याला दुसऱ्या महिलेला नग्न पाहिल्या शिवाय त्याची कामभावना उद्दीपती होत नव्हती. त्या शिवाय तो कामच करू शकत नव्हता. म्हणून तो अश्विनीबरोबर समागम करत असताना एकाच शॉटमध्ये ढेपाळत होता. त्याच्यासमोर तिच्यासारखी मादक, सेक्सी महिला असताना ही त्याची कामभावना जागृत होत नव्हती. म्हणून तर त्याने तिच्या त्या हॉस्टेलमधील महिलांचे नग्न व्हिडीओ तयार करून त्याच्या मोबाईलवर पाठवण्यास तिला सांगितले होते. तिची ही आपल्या प्रियकरासाठी काय वाटेल ते करण्याची तयारी असल्याने तो सागेल तसेच ती करत होती. पोलीसांनी या दोघांचे मोबाईल जप्त करून आधिक तपासासाठी फॉरेन्सिक लॅबला पाठविले होते. या प्रकरणी पोलीसांनी अश्विनी आणि तिचा प्रियकर प्रभू या दोघाच्या विरोधात आय.पी.सी.कलम ३५४ कलमान्वये गुन्हा दाखल करून त्या दोघांना जेलमध्ये पाठवले होते. या घटनेची माहिती प्रमारमाध्यमांना पोलीस उपयुक्त डी.देवराज यांनी दिली.या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गुन्हा लपवण्यासाठी त्याच्याकडून भलतेच...

ईशी हा सहा वर्षाचा मुलगा आपल्या आईसोबत शेतात गेला होता. आई शेतात काम करत असताना तो आपल्या तेरा वर्षाच्या मित्रासोबत खेळत होता. यादरम्यान या दोन्ही मित्रांमध्ये शुल्लक कारणावरुन भांडण सुरू झालं. या भांडणादरम्यान सुरुवातील त्याच्या एका मित्राने छोट्या दगडाने मारलं. यामुळे मोहितला जखम झाली व त्यातू रक्तश्राव होऊ लागला. मोहितला जखम झाल्याचे पाहून तो घाबरला आणि तो दुसऱ्या कोणाकडे तक्रार करेल या भीतीने त्याहून मोठा दगड त्याच्या डोक्यात घातला. याबाबत शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घाबरलेल्या मुलाने मोहित कोणाकडे तक्रार करेल या भीतीने अजून मोठा दगड घातला आणि यातून त्याचा मृत्यू झाला. याबाबत शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे मुलांचे भावविश्व किती आक्रमक झाले आहे हे पुन्हा समोर आले आहे. अनेकदा लहान मुलांना कशी वागणूक दिली जाते किंवा त्याच्यासमोर ज्या गोष्टी घडतात यावरुन त्यांचं भावविश्व फुलत जातं. यामुळे लहान मुलांना आक्रमक अशा व्हिडीओ गेम्सपासून दूर ठेवण्याचा सल्ला दिला जातो. याशिवाय त्यांच्या आजूबाजूचं वातावरण, टीव्ही, सोशल मीडिया याचा भयंकर परिणाम मुलांवर होत असल्याचं पुन्हा एकदा समोर आलं आहे.

## छेडछाडीच्या प्रकरणात मध्यस्थी ...

गल्लीत आणि मित्र परिवारात मानणारे हे लोक होते. त्याच्या स्वभावामुळे त्यांनी अनेक मित्र जमवले होते. बुधवार दि.डिसेंबर रोजी ते रात्री नेहमी प्रमाणे कामावरून घरी आले होते. जेवण करून ते उशिरा बाहेर फिरायला गेले होते. त्यावेळी रात्री गेलेले जयपाल हे थोडयावेळाने परत येतील असे त्याच्या पत्नी मुलांना वाटले होते. म्हणून ते त्यांची वाट बघून जेवणखान करून झोपी गेले होते. ते कधी कधी रात्री घरचे झोपल्यानंतर घरी परत येतात हे त्याच्या घरच्या लोकांना माहित होते. आणि आता ही ते नेहमी प्रमाणे बाहेर कुठे तरी मित्रांच्या कडे गप्पा मारायला गेले असतील असा समज त्यांच्या घरच्या लोकांनी करून घेतला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजणेच्या सुमारास मॉर्निंग वॉकला लोक बाहेर पडले होते.त्यावेळी आंबडेकर गल्ली सोडून चार गल्ल्या कुलकर्णी गल्लीतील रथ रोडवरील लक्ष्मी मूर्तीची प्रतिष्ठापना करतात त्या मेन रोडवरीत एका तरूणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडला असल्याचे लोकांना दिसला. त्यांनी या घटनेची माहिती शहापूर पोलीसांना दिली. सकाळ सकाळ खूनाची घटना घडल्याची महिती मिळाल्यावर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मृतदेहाची ओळख लगेचच पटली होती. सदरचा मृतदेह हा आंबेडकर गल्लीतील जयपाल मसणू गराणी याचा असल्याचे लोकांनी ओळखून तशी माहिती त्यांनी पोलीसांना दिली होती. पोलीसांनी ही गराणी याच्या घरच्या लोकांना यासंबंधी माहिती देवून घरच्या लोकांना घटनास्थळी बोलावून घेतले होते. त्याच्या घरच्या लोकांनी ही त्याचा मृतदेह पाहून हंबरडा फोडला होता. त्याच्या मानेवर, शरीरावर धारदार हत्याराने वार करण्यात आले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला होता.जयपाला याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास पोलीसांनी चालू केला होता. त्याचे कुणाशी कसले वैर होते. जेणे करून त्याचा खून करण्यात आला होता. पोलीस या घटनेचा तपास करत असताना घटनेनंतर काही तासातच या घटनेतील संशयीत आरोपीना पकडून ताब्यात घेतले होते. जयपाल गराणी हे वाहन चालक असल्याने त्यांची अनेकांशी मैत्री होती.ते राहत असलेल्या गल्लीत त्याचा दबदबा होता. त्याचा शब्द कधी ही कुणी ही मोडत नव्हते. तसा त्याच्या शब्दाला मान होता.म्हणून तर ते गल्लीतील भांडणे पुढे होऊन मिटवत होते. गेल्या वर्षभरापूर्वी आंबेडकर गल्लीतच राहत असलेल्या ज्योतीराज दोडमणी या तरूणाचा त्याच गल्लीत राहत असलेल्याइतर तरूणाबरोबर वाद झाला होता. त्यावेळी त्याने बाहेरच्या गल्लीतील आपले मित्र बोलावून गल्लीतील तरूणांना मारहाण केली होती. हे भांडण त्यावेळी जयपाल यांनी पुढे होऊन मिटवले होते. आणि ज्योतिराज दोडमणी याला चांगली समज देवून गल्लीत राहत असताना व्यवस्थीत राह.गल्लीतील मित्रांच्याबरोबर भांडण करून मारामारी करू नकोस असा सल्ला दिला होता. त्यावेळी ज्योतीराज दोडमणी याने गल्लीतीलच एका मुलीची छेड काढली होती.त्यावरून त्यावेळी मारामारी झाली होती. त्याला समज देताना जयपाल यांनी त्याला खडे बोल सुनावत चार थप्पड ही मारल्या होत्या. याचा राग ज्यातीराज याला आलेला होता. जयपाल यांनी त्याचा चारचौझात अपमान केला आह. त्यामुळे तो त्याच्यावर चिडून होता. त्यानंतर मात्र जयपाल हे झाले गेले गोष्ट विसरून गेले होते. त्याच्या मनात त्यावेळी ही काही नव्हते. आणि आता ही काही नव्हते. ते सरळमार्गी असल्याने त्याचे कामात लक्ष होते. कुणी आपल्यावर चिडून आहेत. किंवा कुणी आपल्यावर डुख धरून आहेत याची त्यांना जराही कल्पना नव्हती. मात्र इकडे ज्योतीराज दोडमणी याच्या डोक्यात मात्र जयपाल विषयी राग होता.तो त्यांना चांगलाच धडा शिकवून आपल्या झालेल्या अपमानाचा बदला घेऊ इच्छित होता. तसे त्याने या विषयी आपल्या मित्रांना ही सांगून जयपाला याला धडा शिकवूया. वेळ आली तर त्याची गेम ही करूया असे सांगितले होते. त्याच्या मनात पूर्ववैमन्यस्तयातून धुसमुस सुरू झाली होती. आता गेल्या वर्षभरापासून तो आणि त्याचे मित्र जयपालला मारण्याची गेम आखत होते. परंतु जयपाल याचा मित्र परिवार मोठा असल्याने व ते सहसा कधीच एकटे राहत नाहीत याची त्यांना कल्पना होती. एकाच गल्लीत राहत असून सुध्दा ते कधीच एकटे भेटत नव्हते. तसे ते रात्री जेवणखान करून बाहेर एकटेच फिरायला येतात याची त्याना कल्पना आलेली होती. बुधवार दि.१६ डिसेंबर २०२२० रोजी जयपाल हे रात्री घरातून जेवण करून बाहेर पाय मोकळे करायला म्हणून बाहेर पडले होते. जाताना ते दोघा चैझाशी हाय हॅलो करत बोलले ही होते. एक दोघांशी गप्पा ही मारल्या होत्या.असे करत ते राहत असलेल्या गल्ल्या सोडून चार गल्ल्या ते पुढे चालत आले होते. त्यावेळी कुलकर्णी गल्लीतील मेन रोडवर ते आले असता रात्रीच्या दहाच्या सुमारास तेथे अंधारात लपवून बसलेले ज्योतीराज दोडमणी, अक्षय कोलकार, प्रशांत कळळीमणी, प्रताप गराणी, रोहित दोडमणी, शिवराज उर्फ सोन्या दोडमणी या सहाजणांनी त्यांना एकटे गाठून आपल्या कडील धारदार तलवार आणि कोयत्याने त्याच्यावर वार करत त्याना खाली पाडले होते.हा वार ते बसावध असताना झाला होता.त्याच्या ध्यानी मनी ही त्यावेळी काही नव्हते. हे सवे सहा जणांनी मिळून त्यांना खाली पाडून त्याच्या मानेवर, छातीवर आणि गळ्यावर धारदार वार करून त्याना रक्तालांच्छित करून घायाळ केले होते. रात्रीच्या अंधारात ही थरारक घटना घडली होती. त्याना त्यांनी ओरडण्याची ही संधी दिली नव्हती. रस्त्यावर ही त्यावेळी कुणी नव्हते. पाच एक मिनिटात या सहाजणांनी त्याची गेम करून तेथून पलायान केले होते. रात्रभर ते तसेच मेनरोडवरील कडेला रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्या हल्ल्यात त्याचां जागीच मृत्यू झाला होता. सकाळी फिरायला जाणाऱ्या लोकांना त्याचा मृतदेह दिसल्याने त्यांनी या घटनेची माहिती शहापूर पोलीसांना आणि त्याच्या घरच्या लोकांना दिली होती. रक्ताच्या थारोळ्यात त्याचा छिन्नविच्छन्न झालेला मृतदेह पाहून जयपाल यांची पत्नी आई आणि मुलाने मोठयाने आक्रोश केला होता. या घटनेची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पोलीसांनी मृतदेहाची ओळख पटवून घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला होता. पोलीस या घटनेचा तपास करत असताना वेगवेगळ्या ॲगलने तपासाला सुरूवात केली. त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याची माहिती त्याच्या घरच्या लोकाकडून घेत असताना त्याच्या खूनाला मागील भांडणाची पार्श्वभूमी असल्याचे त्याच्या लक्षात आले होते. पोलीसांनी घटनास्थळावर असलेल्या एका सीसीटिव्ही कॅमेऱ्यात या घटनेचे पुरावे मिळाले होते. त्याचे फुटेज मिळवून आणि खबऱ्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील संयशीत आरोपी ज्योतीराज दोडमणी याला संशयावरून ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे जयपाल याच्या खूनाची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला सीसीटिव्हीचे फुटेज दाखवले असता त्याने आपल्या गुन्हयाची कबुली देऊन मागील भांडणाच्या रागातून जयपाल गराणी याचा आपल्या मित्राच्या मदत्तीने खून केल्याचे सांगितले. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या गुन्हयातील सतर पाच जणांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे ही या गुन्हयाची चौकशी केली. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल करून हा जयपाल याची हत्या ही ज्योतीराज दोडमणी याच्या सांगण्यावरून केल्याचे सांगितले.दोडमणी आणि गुराणी या दोघात मागील वर्षी भांडण झाले होते.त्याचा राग ज्योतीराज दोडमणी याच्या मनात होता.याचा अर्थ पूर्ववैमन्यास्तून त्यांनी जयपाल याचा खून केला होता. जयपाल गुराणी याच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी जयपाल मसणू गुराणी (वय ३५) याच्या खून प्रकरणी ज्योतीराज सिद्राय दोडमणी (वय २४), अक्षय कृष्णा कोलकार (वय २४) प्रशांत कृष्णा कळळमणी (वय ३०) प्रशांत वसंत गराणी (वय २८),रोहीत राजेंद्र दोडमणी (वय २३) शिवराज उर्फ सोन्या नागेश दोडमणी (वय २१) रा.सर्वजण आंबेडकर गल्ली जुने बेलगाव याच्या विरोधात आय.पी.सी.कलम ३०२, या गुन्हयासह इतर कलमाखाली गुन्हा नोंदवून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. म्हणून पोलीसांनी त्याची रवानगी हिडंलगा जेलमध्ये केली होती. न्यायालयीन कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडुन गुन्हयात वापरलेले तलवार आणि कोयता जप्त केले होते. या घटनेचा तपास पोलीस उपायुक्त विक्रम घाटगे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राघवेंद्र हवालदार, याच्या पथकाने केला. त्याना पो.उप.निरी.मंजुनाथ नाईक, उदय पाटील, आर.आय.सनदी. शामसुंदर दोडनायकर, एन.सी.तुरमंदी, ए.व्ही.निलप्पनाव्वर, आ.ए.बडीगेर, एस.ए. सोमापूर यांनी मदत केली.

पान ८ वरून....

## पोलिसांच्या कारभारावर भाष्य करणारे ...

जितेंद्र पाटील, नितीन पेंढारी, तुस्कानो घोन्सालो, भालचंद्र होलम आणि प्रविण म्हाप्रळकर या मान्यवरांनी या सभेत आपल्या सूचना व तक्रारी मांडल्या. नालासोपारा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी, प्रामुख्याने पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर माचेवाल आणि शहर शांतता समिती सदस्य ॲड.रमाकांत वाघचौडे यांनी या संयुक्त सभेसाठी प्रयत्न केले. सभेला तुळींज, वालीव, माणिकपूर, वसई, पेल्हार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रस्ते वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरीक्षक गोंदे यांनी वाहतूक कोंडी करण्याऱ्या पार्किंगची समस्या गंभीर असल्याचे मान्य केले. रेल्वे स्टेशन जवळील रहदारीत उभी असलेली वाहने आता आमच्या समोरची मोठी अडचण आहे. महापालिकेच्या वतीने सुद्धा आम्हाला सहकार्य हवे आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभारप्रदर्शन सोपारा इंग्लिश हायस्कूलच्या शिक्षिका आरती वगळ-हातोडे यांनी केले. राष्ट्रगीत गायनाने समारोप झाला. शांतता आणि समृद्धी बरोबरीने नांदत असते. गतिमान विकासाला शांतता हवी असते. पोलिसांचा कारभार त्याला अपवाद नाही. आम्हाला समाजातील शांतताच अपेक्षित आहे. वसई विरार भागात कधी जातीयवादी संघर्ष झाले नाहीत. दंगली झाल्या नाहीत. या भागातील सर्वधर्मीय नागरिकांचे, सर्वपक्षीय नेत्यांचे हे श्रेय आहे. या भागातील हा समंजसपणा अभिनंदनीय आहे. अशा शब्दांत मिरा भाईंदर आणि वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे उपायुक्त संजयकुमार पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आता आयुक्तालय आले आहे आणि नागरिकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. आम्हाला नव्या रचने प्रमाणे वाढीव पोलीस अधिकारी मिळाले आहेत जरुर मात्र कर्मचारी संख्या वाढली नाही. किंबहुना म्हणूनच आज पोलीस बळाला सजग नागरिक आणि पोलीस मित्रांचे बळ गरजेचे आहे. मोहल्ला कमिटी बनवतात ती सर्वसमावेशक होईल असे धोरण असावे ही बाब बीट अधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावी असेही पाटील यांनी सूचित केले. तीन नवी पोलीस स्टेशन्स आणि चौक्या आपल्या या वसई तालुक्यात होणार आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे गुन्हे प्रमाण वाढले आणि यावर उपाय म्हणून शासनाने इकडे आयुक्तालय दिले. सुधारणा होत आहे आणि आम्हाला हवे असलेले सहकार्य लाभते आहे. आमच्या उपक्रमात नागरिकांचा सहभाग आम्हाला प्रेरणा देणारा आहे,असेच सहकार्य पुढे ठेवावे असे आवाहन आयुक्त सदानंद दाते यांनी केले. ज्येष्ठ पोलीस अधिकारी सुरेश खोपडे यांच्या संकल्पनेतील हा उपक्रम राबविला जात आहे. धारावीत वकार खान आणि भाऊ कोरडे यांनी दंगल काळात जे काम केले आहे ते अविस्मरणीय आहे. असा जुन्या आठवणींना उजाळा देत दाते यांनी सभेचा निरोप घेतला.

## पालकमंत्री अमित देशमुखांच्या...

पालकमंत्री अमित विलासराव देशमुख बोलत होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, अदितीताई अमित देशमुख, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, जिल्हा परिषदेचे सदस्य धनंजय देशमुख, राज्य साखर संघाचे आबासाहेब पाटील, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, संत शिरोमणी मारोती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजूळगे, विलासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे, बाजार समितीचे उपसभापती मनोज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.विकासरत्न विलासराव देशमुख, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे नेतृत्व व त्यांच्या विचार आपण सर्वांनी स्वीकारलेला आहे. त्यामुळे त्यांनी दिलेला आधुनिक विचार सर्वांनी स्वीकारणे आवश्यक आहे, असे नमुद करुन पालकमंत्री अमित विलासराव देशमुख पुढे म्हणाले की, शेतात आता गुणात्मक वाढ झाली पाहिजे.केंद्र व राज्य सरकारच्या वतीने कृषीच्या अनेक योजना, अनुदान, कर्जपूरवठा केला जातो आहे.या योजनांचा प्रत्येक शेतकजयांनी लाभ घेतला पाहिजे. ऊसाचे उत्पादन आणखी वाढले पाहिजे. दरडोई उत्पन्न वाढले तर शेतकजयांच्या हातात जादा पैसा येईल, तो पैसा बाजारपेठेत येईल आणि सर्वत्र आर्थिक सुबतता येऊ शकते. विलास सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये ऊस उत्पादकांमध्ये हेक्टरी ऊस उत्पादकता वाढीस प्रोत्साहन मिळावे म्हणुन कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी एकरी १५० मे.टन ऊस उत्पादनाचा पथदर्शी प्रकल्प उभा केला आहे, या प्रकल्पाची प्रेरणा घेऊन शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने ऊस लागवड हाती घावी, असेही आवाहन केले. यावेळी शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील यांनी ऊस लागवडीच्या आधुनिक तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली.प्रारंभी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लक्ष्य १५० मेट्रीक टन ऊस तोडणीचा शुभारंभ करण्यात आला.प्रास्ताविक जयदेव बर्वे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, संचालक युवराज जाधव, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, अनिल पाटील, रणजित पाटील, गोविंद डूरे, सूर्यकांत सूडे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील, ज्ञानोबा पडीले, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते, सतिष गजभार, तुकाराम कानिटकर यांनी केले, सुत्रसंचालन राहूल पाटील यांनी केले तर व्हाईस चेअरमन रविंद्र काळे यांनी आभार मानले.

## कोंकण भवनात रक्तदान शिबिर...

जिंकण्यासाठी सर्व यंत्रणा विविध पद्धतीने प्रयत्न करत आहेत. या लढाईत कोकण विभागातील शासकीय कर्मचारी हे नेहमीच पुढे असतात. हे आज या शिबीराच्या आयोजनातून दिसून आले. या रक्तदान शिबीरात आयोजकांनी सोशल डिस्टन्सिंगसह मास्क आणि सॅनिटाईझरचा योग्य वापर केला. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री. प्रदिप कडू, राज्यकर सहआयुक्त (वस्तू व सेवा कर), कमलेश नागरे उपायुक्त (वस्तू व सेवाकर), डॉ.नागरगोजे उपायुक्त (वस्तू व सेवाकर), डॉ. गणेश मुळे, उपसंचालक (महिती) कोकण विभाग, बी.एस. सोनावणे, सहाय्यक संचालक (आरोग्य), वैद्यकीय अधिकारी (कोकण भवन) डॉ.गणेश धुमाळ, वैद्यकीय अधिकारी (डी.वाय.पाटील हॉस्पिटल) डॉ.सीमा गुप्ता यांनी विशेष परिश्रम घेतले. डी.वाय.पाटील हॉस्पिटलच्या रक्तपेढीने सदर उपक्रमास उस्त्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी डी.वाय.पाटील हॉस्पिटल रक्त संक्रमण अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राज्य कर अधिकारी, श्रीम.अश्विनी चौधरी (कोकण विभाग महिला अध्यक्षा) यांनी शिबीराच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

## वसई-विरारमधील मंदिर, मस्जीद, चर्च...

सरला, साहित्य आणि विजयी या ब्लड बँकेच्या सहकार्याने वसई-विरारमधील २५ हुन अधिक ठिकाणी हा रक्तदान महोत्सव पार पडला. न्यु इंग्लिश स्कूल वसई, गोखिवरे मराठी शाळा, मरीयम नगर रेसीडेंशल असो.नायगांव, रवी हॉस्पटील, चंपादेवी मंदिर भुईगांव, पापडी हुतात्मा चौक, गीरीज तलाव, वृंदावन सोसा.नालासोपारा, गुरुद्वारा वसईरोड , गणपती मंदिर शास्त्रीनगर, सेंट मायकल चर्च, दिनदयाळनगर मस्जिद अशा प्रमुख ठिकाणी ही शिबीरे घेण्यात आली. दरम्यान रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन, रक्तदान करावे, असे आवाहन वसईचे आ. हितेंद्र ठाकूर, वसई विरार महापालिका आयुक्त गंगाथरण. डी, अभिनेता भाऊ कदम, अभिनेत्री प्राजक्ता नावणारे, मीनाक्षी कोसे, अभिनेता शंतनू गगने, सायली पराडकर यांच्यासह अनेक सिनेकलावंतांनी रक्तदान करण्याचे आवाहन काही दिवस आधीपासून माध्यमातून केले होते.

## देवणीत रासपच्या आमरण उपोषणाची ...

करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले व तसेच उपोषणकर्ते आनंद जिवणे व बिरु कल्याणकार यांनी सदरील उपोषण मागे घेतल्याचे प्रशासनाला लेखी पत्र दिले. चौकशी अंती येत्या पंधरा दिवसात जिल्हा प्रशासन काय कारवाई करणार याकडे देवणीकरांचे लक्ष लागून आहे.

## वसई-विरार शहर महापालिकेने ...

दिला. आज ठाण्यातून चालत असलेल्या महानगरपालिकेने हा कर लागू केला असल्याने हे दोघे एका माळेचे मणी असल्याचे यावेळी ते म्हणाले. यावेळी मंचावर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील, जिल्हा महासचिव महेंद्र पाटील, राजू म्हात्रे व औद्योगिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष रितेश सत्यनाथ उपस्थित होते. वसई रोड मंडळ अध्यक्ष रामनुजम, मंडळ सरचिटणीस रमेश पांडे, महेश सरवणकर, वि

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:13 PM Page 1



# अकलूज येथील घरफोडी उघडकीस; आठ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील घरफोडी उघडकीस आणण्यात सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून तिघांना जेरबंद करून त्यांच्याकडील सोन्याचांदीच्या दागिन्यांसह, मोटारसायकल व मोबाईल असे ८ लाख १२ हजार ९५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भैय्या पैजन शिंदे (२९), अमोल गुंडीबा काळे (२२), किरण गुंडीबा काळे (२१) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नांवे आहेत.

८ जून २०२० रोजी अतुल अरविंद गांधी (रा. जयसिंग चौक संग्रामनगर अकलूज ता माळशिरस जि. सोलापूर) यांचे घर फोडून चोरट्यांनी ३५ तोळे सोन्याची दागिने चांदीचे दागिने व सव्वा लाखांची रोकड चोरून नेली होती. याबाबत अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्यासाठी दोन पथके तयार केली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम बुवा व त्यांचे पथक अकलूज - टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना सदर त्यांना सदर घरफोडीचा गुन्हा करणारे आरोपी हे साथीदारांसह सोन्या चांदीचे दागिने विकण्यासाठी मोटारसायकलीवरून अकलूज येथील जुना एसटी स्टँड परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

त्यानुसार सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने जुना एस टी स्टँड परिसरात दोन मोटारसायकलीवरून आलेल्या तीन संशयित व्यक्तीना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सोन्या-चांदीचे दागिने मिळून आले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली नंतर अधिक विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ६ लाख ३५ हजारांचे एकूण १२.७ तोळ्याचे सोन्याचे दागिने तसेच ५७ हजार ९५५ हजारांचे एकूण ८६.५ तोळे चांदीचे दागिने, २ मोटारसायकल व ३ मोबाईल असा एकूण ८ लाख १२ हजार ९५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींना अकलूज पोलीस ठाण्याकडील गुरनं २६६/२०२० भादंवि नुसार ४५७, ३८० कडील सदर गुन्ह्यांत अटक करण्यात आली असून त्यांच्या कडून आणखीन दोन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम बुवा, पोलीस हवालदार १२९८ श्रीकांत गायकवाड, १३६५ बिरुदेव पारेकर, ६१८ सलीम बागवान, पोलीस नाईक ०४ परशुराम शिंदे, लाला राठोड, महिला पोलीस नाईक मोहिनी भोगे, पोलीस कॉन्स्टेबल ८४५ अजय वाघमारे, चालक केशव पवार यांनी बजावली आहे.

# वाड्यात प्रेरणा पुरुष अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती उत्साहात साजरी

**वाडा/प्रतिनिधी**

देशाचे माजी पंतप्रधान व प्रेरणा पुरुष अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती शुक्रवारी (दि.२५) रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने वाडा तालुक्यातील प्रत्येक बुथवर विभागवार मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अटलबिहारी वाजपेयी यांचा १९४२ साली भारत छोडो आंदोलनात सहभाग, १९५७ साली ते पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक जिंकले.

१९७५ साली आणीबाणीच्या काळात त्यांना नजर कैदत ठेवण्यात आले. १९७७ मध्ये त्यांनी भारत सरकार मध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून काम पाहीले. १९९६ मध्ये देशाचे १० वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. १९९९ मध्ये ते तिसऱ्यांदा पंतप्रधान बनले व कारगिल युद्ध जिंकले. वाजपेयी यांच्या जयंतीचे औचित्य साधत देशाचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज शुक्रवारी देशातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचे हे मार्गदर्शन देशातील शेतकऱ्यांपर्यंत जास्तीत जास्त पोहचावे या हेतूने भारतीय जनता पार्टीच्या वतीने या भाषणाची थेट प्रक्षेपणाची व्यवस्था ठिक ठिकाणी विभागवार करण्यात आली असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील व तालुकाध्यक्ष मंगेश पाटील यांनी बोलतांना दिली.

# वसई विरार महापालिकेने सर्व मागण्या मान्य करत अखेर उपोषणकर्त्यांसमोर गुडघे टेकले!

**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि पर्यावरण संवर्धन समिती, वसई विरारतर्फे ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची योजना, जनतेची हक्काची एस.टी. परिवहन बससेवा, IIT व NEERI च्या अहवालाप्रमाणे धारण तलाव (HOLDING PONDS) संदर्भात सोमवार २१ डिसेंबर २०२० पासून वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाविरोधात वसई विरार जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस समीर सुभाष वर्तक आणि सामाजिक कार्यकर्ते मॅकेन्झी पीटर डाबरे यांनी सोमवारी आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी वसई विरार महापालिकेतर्फे अतिरिक्त आयुक्त संतोष देहेरकर, कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड आणि सुरेंद्र ठाकरे यांनी उपोषणस्थळी येऊन लेखी स्वरूपात पत्र दिले. प्रमुख मागणी जी १२ वर्षे रखडलेली ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची योजना जून २०२१ पर्यंत पूर्ण करणे, जानेवारीत परिवहन सेवा चालू करण्याअगोदर तातडीने एस.टी. महामंडळाची बससेवा चालू करणे तसेच IIT व NEERI च्या अहवालाप्रमाणे धारण तलावांचं नियोजन करण्याची लेखी स्वरूपात पत्रात नमूद असल्याची खात्री करून उपोषण स्थगित केल्याचे समीर वर्तक व मॅकेन्झी डाबरे यांनी जाहीर केले. यावेळी उपस्थित फादर ज्यो आल्मेडा, फादर ज्यो डिमेलो, फादर रेमंड रुमाव व फादर सिझर डाबरे तसेच बसिन कॅथॉलिक बँकेच्या मा. अध्यक्षा डोमिनिका डाबरे, वाघोलीचे मा. सरपंच टोनी डाबरे व उपसरपंच सुनील डाबरे, कुपारी संस्कृती मंडळाचे अध्यक्ष जिम रॉड्रीग्ज तसेच ग्रामस्थांच्या साक्षीने फळांचा रस पिऊन उपोषण स्थगित केल्याचे समीर वर्तक व मॅकेन्झी डाबरे यांनी आज दुपारी जाहीर केले. आमरण उपोषणाबाबत सतत आढावा घेवून महापालिका प्रशासनासोबत पाठपुरावा करण्याकरिता पुढाकार घेण्यात महत्त्वाची भूमिका निभावणारे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे महसूलमंत्री ना. बाळासाहेब थोरात, मंत्री यशोमती ठाकूर, पालघरचे खासदार राजेंद्र गावित, मंत्री अस्लम शेख यांच्याशी संवाद साधणारे मा. आमदार मुझफ्फर हुसेन, मा. आमदार मोहन जोशी, सतत संपर्क करून मदत करणारे वसईचे मा. आमदार विवेक पंडित, मा. आमदार विलास तरे, मार्गदर्शक फा. फ्रान्सिस दिब्रिटो, वसई जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा, इतर पदाधिकारी, तसेच वसई जनआंदोलन समिती, काँग्रेस, शिवसेना, मनसे, जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस आदी राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच या आमरण उपोषणाला लेखी पाठिंबा देणारे १८ विविध संघटना आदिंनी महत्त्वाची भूमिका बजावली होती असे समीर वर्तक म्हणाले. समीर वर्तक आणि मॅकेन्झी पीटर डाबरे यांनी सर्व उपस्थित ग्रामस्थांचे आणि प्रसिद्ध पथनाट्यकर झूरान लोपीस व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# हक्कांसंदर्भात जागृती करुन ग्राहकांना अधिक सक्षम करणार -छगन भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी**

नवीन ग्राहक संरक्षण कायदा २०१९ यामधील तरतुदीनुसार राज्यातील ग्राहकांना अधिकाधिक संरक्षण कसे मिळवून देता येईल यासाठी शासन कटिबद्ध असून हक्कांसंदर्भात जागृती करुन राज्यातील ग्राहक अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगामार्फत ग्राहक संरक्षण कायदा २०१९ चे नवीन स्वरुप या विषयावर आयोजित वेबीनार मध्ये भुजबळ बोलत होते. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शुभेच्छा संदेश दिले.

ग्राहक संरक्षण मंत्री भुजबळ म्हणाले, राज्यातील सर्व नागरिकांना, ग्राहकांना नव्या ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत अधिकाधिक सक्षम बनविण्यासाठी, तयार असलेल्या कार्यप्रणालीची सक्षम पद्धतीने अंमलबजावणी करावी लागेल. सर्व ग्राहकांनी स्वतःच्या अधिकारांविषयी जागृत राहण्याची गरज आहे. झालेल्या फसवणुकीबद्दल ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाद मागता येते. कोरोनाच्या सध्याच्या गंभीर परिस्थितीमध्ये ग्राहकांना न्यायालयात न जाता ऑनलाइन पद्धतीने न्याय मिळण्याची व्यवस्थाही करण्यात आलेली आहे, राज्यभरातील ग्राहकांनी याची माहिती करून घेऊन उपयोग करून घ्यावा. विशेषतः राज्यातील ग्राहक हे अधिक सक्षम व्हावेत, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यानिमित्ताने सर्व नागरिकांना ग्राहकांना शुभेच्छा देतो आणि ग्राहक फसवणूक मुक्त महाराष्ट्र होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणण्याचे आश्वासन देतो, अशी ग्वाही भुजबळ यांनी दिली. या वेबिनारमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री विश्वजीत कदम म्हणाले, राज्याने ग्राहकांच्या न्याय्य हक्कासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. प्रत्येक नागरिक हा ग्राहकच असतो. त्यांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल. असे सांगून कदम यांनी ग्राहक दिनानिमित्त सर्व ग्राहकांना शुभेच्छा दिल्या.

वेबिनारमध्ये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे प्रभारी अध्यक्ष दिलीप शिरासाव यांनी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ चे नवीन स्वरुप या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच अन्य मान्यवर तज्ज्ञांनी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ चे नवीन स्वरुप विषयावर मार्गदर्शन केले. ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य डॉ. संतोष काकडे यांनी प्रास्ताविक व कार्यक्रमविषयक भूमिका विषद केली.

# विरार पोलिसांनी मोटार सायकल, मोबाईल चोरांच्या मुसक्या आवळल्या

**विरार/प्रतिनिधी**

विरार शहरात मोटार सायकल चोरी आणि मोबाईल स्नॅचिंगच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे लक्षात घेता त्यास प्रतिबंध घालण्यासाठी मीरा भाईंदर वसई विरार चे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या सूचनेनुसार अप्पर आयुक्त जय कुमार, उपआयुक्त प्रशांत वाघुले, सहा. उपआयुक्त विरारच्या रेणुका बागडे, विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब आहेर, पो.नि. विवेक सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने मोटार सायकल चोरी आणि मोबाईल स्नॅचिंग करणारा सराईत गुन्हेगार प्रेमपाल चौहान (वय २२), रा. कुंभारपाडा, सीएम चाळ, गल्ली नं. ८, विरार (पूर्व) याच्या मुसक्या आवळल्या. त्याला अटक करून चौकशी केली असता २ वाहन चोरी, ३ मोबाईल जबरी चोरी असे गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. त्याच्याकडून २ वाहन आणि ३ मोबाईल एकूण किंमत ६० हजारचा ऐवज विरार पोलिसांनी हस्तगत केला आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पो. उपनिरीक्षक संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. सचिन घेरे, पो.ना. जगदीश मराठे, पो.ना. हर्षद चव्हाण, पो.ना. भूषण शेरमाळे, पो.शि. पवन पवार, पो.शि. इंद्रनील पाटील, पो.शि. सुमित जाधव, पो.शि. रवी वानखेडे, पो.शि. सुनील पाटील, यांच्या कौशल्याने प्रेमपाल चौहान या सराईत गुन्हेगाराला मुद्देमालासह ताब्यात घेतले.

# पालघर जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेसाठी २८ डिसेंबर २०२० ते १० जानेवारी २०२१ पर्यंत मनाई आदेश

**पालघर/प्रतिनिधी**

मराठा समाजास शिक्षण व नोकरीत देण्यात आलेल्या आरक्षणास मा.सर्वाच्च न्यायालय यांनी स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील मराठा आरक्षण कृती समिती, मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज तसेच विविध हिंदुत्ववादी संघटना व राजकीय पक्ष यांचेकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात येत आहेत.

सदर मराठा समाजास लागू करण्यात आलेले आरक्षण तात्काळ मिळावे या मागणीकरीता राज्यभरात विविध मराठा संघटनांकडून ठिकठिकाणी बैठका आयोजित केल्या जात असून मराठा समाजात लवकरात लवकर आरक्षण मिळावे, या करीता जिल्हयातील खासदार, आमदार, मंत्री यांचे निवासस्थान, कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन अशा विविध प्रकारची आंदोलने करण्यात आली आहेत. भविष्यात सदर बाबत लवकरात लवकर निर्णय झाला नाही तर वरील संघटनांकडून अचानकपणे रास्ता रोको करणे, धरणे धरणे, मंत्री महोदय यांचे दौरा दरम्यान निवेदने देणे, घेराव घालणे, घोषणाबाजी करणे अशा प्रकारची आंदोलने करण्याची भविष्यात शक्यता नाकारता येत नाही व त्यावरुन आंदोलने होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाने संसदेत १) कृषी उत्पन्न, व्यापार आणि वाणिज्य २) कृषी मुल्य आश्वासन, ३) कृषी सेवा करार अशी ०३ विधेयके मंजूर केलेली आहेत. सदर विधेयकास देशभरातील तसेच राज्यातील शेतकरी शेतकरी संघटना/ राजकीय पक्ष यांचेकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे. विधेयके मंजूर झाल्याने विविध स्वरुपाची उग्र आंदोलने होऊन भारत बंद सुध्दा पुकारण्यात आलेला होता. वरील तिन्ही विधेयकाबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण केल्यामुळे भविष्यात वरील ०३ ही विधेयके रद्द व्हावीत या मागणी करीता शेतकरी व शेतकऱ्यांना पाठींबा देणाऱ्या विविध संघटना व राजकीय पक्षाकडून आंदोलने चालू आहेत.

वाढवण, ता.डहाणू येथील नियोजित वाढवण बंदर या प्रकल्पास वाढवण परीसरातील ग्रामस्थ, वाढवण विरोधी संघर्ष समिती, विविध राजकीय पक्ष व स्थानिक पातळीवरील विविध संघटनांनी रॅली काढून व निदर्शने करुन नियोजित वाढवण बंदर प्रकल्प रद्द करावा या मागणीकरीता मोठया प्रमाणात विरोध दर्शविलेला आहे. तसेच भविष्यात वाढवण बंदर अनुषंगाने कोणतेही काम करावयाचे ठरविल्यास (सर्व्हे, जमीन मोजणी, माहिती गोळा करणे) ग्रामस्थांकडून, संघटनांकडून व राजकीय पक्षांकडून मोठया प्रमाणात विरोध करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जावू शकतो. तसेच रिलायन्स कंपनी कडून पालघर जिल्हयात गॅस वाहून नेण्याकरीता पाईप लाईनचे काम करण्यात आलेले आहे. सदर कंपनीकडून अद्यापही काही प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांवर अन्याय झाला असलेबाबत वेळोवेळी बैलगाडी, मोर्चा, उपोषण, धरणे, आंदोलने इत्यादी आंदोलने करण्यात आलेली आहेत. परंतू आपणास अद्यापही रिलायन्स कंपनीकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याने प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांकडून बेमुदत उपोषणाचा इशारा दिलेला आहे.

कोविड-१९ च्या लॉकडाऊन कालावधीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडून वितरीत झालेली विज बिले ही वाढीव असल्याच्या कारणावरुन विविध संघटनांनी व राजकीय पक्षाने मोठया प्रमाणात विज बिले कमी करावीत या मागणीसाठी मोठया प्रमाणात आंदोलने केलेली असून भविष्यात ती विज बिले कमी न केल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा दिलेला आहे.

कार्यकारी अभियंता एम.एम.आर.डी.ए. यांचे मार्फत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवटा योजने अंतर्गत मौजे वैती, ता.डहाणू येथे प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्राचे कामकाज करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने वेती गावातील नियोजित प्रकल्पाचे ठिकाणी असणाऱ्या जागेवरील वृक्ष तोड, कम्पाउंड घालणे व इतर कामे विविध विभागामार्फत दि.२१/१२/२०२० रोजी पासून पोलीस बंदोबस्तात सुरु करण्यात आलेली आहेत. सदर प्रकल्पास स्थानिक लोकांचा अजूनही विरोध असल्याने वृक्ष तोडणी व कम्पाऊंड घालणे या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. कोविड-१९ च्या अनुषंगाने पालघर जिल्हयामध्ये घडलेल्या घटनांबाबत काही संस्था, काही राजकीय गट, काही राजकीय व्यक्ती यांच्याकडून राज्य सरकारने केलेल्या कामाचे कौतूक तसेच राज्य सरकारने कोविड-१९ बाबत राबविलेल्या योजनांवरुन समज व गैरसमज पसरवून त्यातून वाद-विवाद होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आगामी नाताळ सण, दत्त जयंती तसेच ३१ डिसेंबर वर्ष अखेर व नुतन वर्षाअभिनंदनचे अनुषंगाने नागरीक मोठया प्रमाणात एकत्र येऊन सदरचे सण उत्सव साजरे करीत असतात. पालघर जिल्हा जातीयदृष्टया संवेदनशिल आहे. या उत्सवा दरम्यान क्षुल्लक कारणावरुन विघातक कृत्य करणारे समाज कंटक, जातीय गुंड याचा फायदा घेवून समाजात तेढ निर्माण करुन अशांतता निर्माण करणे अशी कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सामान्य जनजीवन सुरळीत व शांततामय स्वरुपात राहावे, सार्वजनिक शांतता अबाधीत राहावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये त्याच प्रमाणे महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (३) अन्वये पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस अधीक्षक यांचे पूर्व परवानगी शिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणूका काढण्यास या कलमान्वये आदेशात नमुद असावे.

याकरीता वरील घटनांच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पालघर जिल्ह्यात (वसई तालुका वगळून) हद्दीत दि. २८/१२/२०२० रोजीचे ००.०१ वा. पासून ते दि.१०/०१/२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोट कलम (१) व कलम ३७ चे पोट कलम (३) चे स्वतंत्र आदेश लागू करणेस विनंती आहे. असे कळविले आहे. उपरोक्त नमुद परिस्थितीनुसार पालघर जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक पालघर यांचे कार्यक्षेत सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी पालघर डॉ.किरण महाजन, यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून पालघर जिल्हयातील पोलीस अधीक्षक पालघर यांचे कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २८/१२/२०२० रोजीचे ००.०१ पासून ते दिनांक १०/०१/२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत या कालावधीमध्ये खालील बाबीसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, ६. अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे. २) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे. ३) दगड किंवा क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे. किंवा तयार करणे. ४) त्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृती किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे. ५) जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे. ६) ज्यामुळे सभ्यता अगर नीतिमत्ता यांस धक्का पोहोचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे, हावभाव करणे अगर सोंग आणणे, आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा त्यांचा जनतेत प्रसार करणे. वरील कलम ३७ (१) अंतर्गतचा हा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरीष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्त्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागु असणार नाही. त्याच प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) चे पोटकलम (३) अन्वये पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस अधीक्षक पालघर यांचे पुर्व परवानगीशिवाय सभा घेण्यांस किंवा मिरवणुका काढण्यास या आदेशान्वये बंदी घालीत आहे. हा आदेश लग्न कार्यासाठी जमलेले लोक प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणूका यांना लागू असणार नाही.

28 DEC TO 03 JAN 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 26/12/2020 8:14 PM Page 1



# पोलिसांच्या कारभारावर भाष्य करणारे खुले व्यासपीठ म्हणजे आपली मोहल्ला कमिटी -पो.आयुक्त सदानंद दाते

**नालासोपारा/प्रतिनिधी**

पोलिसांच्या एकूण कारभारावर नागरिकांकडून खुले भाष्य केले जाते ते व्यासपीठ म्हणजे आपण सुरु केलेल्या मोहल्ला कमिट्या. पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद कायदा आणि सुव्यवस्था बळकट करण्यासाठी अत्यंत गरजेचा असतो. खरं तर पोलीस हा वर्दितील नागरिक आणि नागरिक हा सुद्धा बिनवर्दिचा पोलीस असतो. आपल्याला हे नाते जपायचे आहे. म्हणून या पुढे प्रत्येक महिन्याला सर्व मोहल्ला कमिटीची बैठक झाली पाहिजे, असे विचार मिरा भाईंदर आणि वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे प्रथम आयुक्त सदानंद दाते यांनी येथे बोलताना व्यक्त केले. नालासोपारा पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन मोहल्ला कमिट्यांच्या संयुक्त बैठकीत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. तिवारी कॉलेज सभागृह मदर मेरी हायस्कूल, श्री प्रस्थ नालासोपारा पश्चिम येथे ही बैठक काल संध्याकाळी संपन्न झाली. विभागीय पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील, अश्विनी पाटील, नालासोपारा पोलीस निरीक्षक वसंत लब्दे हे मान्यवर या वेळी व्यासपीठावर होते.

आपल्या भाषणात आयुक्त सदानंद दाते पुढे म्हणाले की पोलीस खात्यावर होणारे भ्रष्टाचार आणि दप्तर दिरंगाईचे आरोप होतात, त्यावर आपण आपल्या कार्यकाळात प्रत्यक्ष कृतीत बोलू. तसेच राज्य घटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन सर्व सभासदांनी जरुर करावे. त्यातच आपल्या सर्वांची खरी ओळख आहे असे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी सांगितले.

या संयुक्त सभेत वपोनि वसंत लब्दे यांनी प्रास्ताविक केले.आवाहनाला प्रतिसाद देत येथील नगरसेवक व उद्योजकांनी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात पुढाकार घेतला आहे. त्यांचे आभार मानले. प्रथम उपमहापौर सगीर डांगे, प्रभाग समिती सभापती अतुल साळुंखे, किशोर पाटील, नगरसेवक व विविध पक्षांचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी ज्येष्ठ समाजसेवक आब्बास फौजी, समाजसेवक मुजफ्फर घन्सार, वसिम खान, शुभांगी गायकवाड, नरेश जाधव, विवेक पाटील, ... पान ६ वर

# पालकमंत्री अमित देशमुखांच्या हस्ते ऊस तोडणी कार्यक्रमाचा शुभारंभ!

लातूर/प्रतिनिधी

शेती व्यवसाय फायदयाचा ठरण्यासाठी शेतकऱ्यांनी अदयायावत तंत्रज्ञानाचा वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याचे प्रयत्न करायला हवेत असे सांगून प्रयोगशिल शेतकऱ्यांना शासन तसेच साखर कारखान्याच्या वतीने योग्य माग्रदर्शन व आवश्यक ती सर्व प्रकारची मदत करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी दिले. विलास सहकारी साखर कारखान्याच्या वतीने बाभळगाव येथे आयोजित लक्ष्य ऐकरी १५० मेट्रीक टन ऊस तोडणी पथदर्शी प्रकल्पचा शुभारंभ राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी ... पान ६ वर

### मुख्यमंत्री महोदयांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

# कोंकण भवनात रक्तदान शिबिर संपन्न

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोकण भवन राजपत्रित अधिकारी महासंघ, वस्तू व सेवा कर अधिकारी-कर्मचारी संघटना समन्वय समिती यांच्या संयुक्त सहकार्याने घेण्यात आलेले रक्तदान शिबीर राज्यात अनुकरणीय ठरेल असा विश्वास अतिरीक्त आयुक्त वस्तू व सेवा कर ठाणे झोन सुमेर कुमार काळे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या सूचनेनुसार आज दि.२३ डिसेंबर २०२० रोजी कोकण भवन येथील दुसऱ्या मजल्यावर असलेल्या महिला भोजन कक्षामध्ये या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. विशेष म्हणजे कार्यक्रमासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी सर्वप्रथम रक्तदान करून या शिबिराला सुरुवात केली. कोकण भवन व जवळील परिसरातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरीकांनी मोठया संख्येने रक्तदान करून या समाजकार्यात कर्तव्य भावनेने आपला सहभाग नोंदविला. कोरोना महामारी सोबत संपूर्ण जग लढत आहे. करोना व्हायरसविरुद्ध असलेले हे युद्ध ... पान ६ वर

# वसई-विरारमधील मंदिर, मस्जीद, चर्च, गुरुद्वारात एकाच वेळी महारक्तदान

**वसई/प्रतिनिधी**

कोरोनाच्या काळात निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रविवारी, २० डिसेंबर रोजी वसई-विरार मधील विविध ठिकाणच्या मंदिर, मस्जीद, चर्च आणि गुरुद्वारात एकाचवेळी महारक्तदान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच याच दिवशी वसई तालुक्यातील विविध सेवाभावी सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक, राजकीय संस्थांच्या सहभागाने २५ हुन अधिक ठिकाणी झालेल्या रक्तदान महोत्सवात एकूण १७२८ बाटल्या रक्त संकलित करण्यात संयोजक यशस्वी झाले आहे. वसईतील न्यू इंग्लिश स्कुल मध्ये आयोजित जागृत नागरीक संघटनेच्या शिबिरात आमदार क्षितिज ठाकूर यांनी रक्तदान केले. तर आमची वसई व इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे वसईरोड येथील रवी हॉस्पिटल मध्ये आयोजित रक्तदान उपक्रमात वसई विरार महानगर पत्रकार संघांचे

अध्यक्ष, तथा कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वसई शाखेचे अध्यक्ष अनिलराज रोकडे यांनी रक्तदान केले. वसईरोड येथील गुरुद्वारा मध्ये 'समाधान फाऊंडेशन' तर्फे आयोजित शिबिरात सर्वाधिक २७८ बाटल्या रक्त संकलित झाले. कोरोनामुळे राज्यात रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी अनेक ठिकाणी शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. त्यात खारीचा वाटा उचलण्यासाठी वसई-विरारमध्ये महारक्तदान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी समाधान फाऊंडेशन', 'जागृत नागरीक संघटना', 'वसई लायन्स क्लब' आणि 'आमची वसई' या संस्थांनी पुढाकार घेतला होता. शिवसेना नेते विजय पाटील, बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, माजी नगराध्यक्ष अजय खोखाणी यांनी विविध ठिकाणी शिबिरांना भेटी देऊन रक्तदात्याचा उत्साह वाढवला. अविनाश कुसे, चिन्मय गवाणकर, राजेंद्र ढगे, प्रा. हनुमंत भोसले यांनी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

रविवारी सकाळी ९ वाजल्यापासून या शिबीराला सुरवात झाली त्यात 'टिम वसई', नेस अलुमी, जेएनएस, वसई, लॉयन्स क्लब, विश्वजीत मित्र मंडळ, वसईचा राजा गणेशोत्सव मंडळ, जाणीव ट्रस्ट, ग्रीन अम्ब्रेला, वसई बीच क्लिनर्स, मुळे चॅरिटेबल ट्रस्ट, देहमुक्त मिशन, दैवज्ञ समाज, स्टेप अप इंडिया, आमची वसई, जीवन आनंद संस्था, अंबाडीरोड गुरुद्वारा, दीनदयाल मस्जिद, उमेळमान ग्रामस्थ आणि काही राजकीय संस्था मिळून विविध पन्नासहून अधिक संस्था सहभागी झाल्या होत्या. बोरीवली, महाराष्ट्र,... पान ६ वर

# देवणीत रासपच्या आमरण उपोषणाची आश्वासनानंतर नवव्या दिवशी सांगता

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरात निकृष्ट दर्जाचे झालेले विकास कामे व भ्रष्टाचार याची चौकशी होऊन संबंधित दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन व्हावे या प्रमुख मागणीसाठी नगरपंचायत समोर दि. १५ डिसेंबर पासून सुरू असेलेले राष्ट्रीय समाज पक्षाचे आमरण उपोषण प्रशासनाच्या लेखी अश्वासनानंतर बुधवार दि.२३ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास रासपचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब दोडतले यांच्या प्रमुख उपस्थितीत उपोषणकर्त्यांनी सरबतचे सेवन करून उपोषण मागे घेतले. जिल्हा प्रशासन व राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब दोडतले व आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यात बराच वेळ लातूर येथे चर्चा झाली. त्यानंतर जिल्हा प्रशासन सदरील उपोषण कर्त्याच्या मागण्या १५ दिवसात चौकशी नंतर मान्य ... पान ६ वर

# वसई-विरार शहर महापालिकेने व्यापाऱ्यांना लावलेल्या कराविरोधात भाजपाचा एल्गार!

**वसई/प्रतिनिधी**

महानगरपालिकेने व्यापाऱ्यांना लावलेल्या कराविरोधात वसई-विरार जिल्हा भाजपाने शंक फुकले असून त्याविरोधात वसईतील विश्वकर्मा हॉलमध्ये घेतलेल्या व्यापाऱ्यांच्या बैठकीस व्यापाऱ्यांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला. व्यापाऱ्यांना संबोधित करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार हेमेंद्र मेहता, महाराष्ट्र प्रदेशचे व्यापारी आघाडीचे महासचिव महेंद्र जैन, भाजपा वसई-विरार जिल्हाध्यक्ष राजन नाईक, भाजपा वसई-विरार व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष विरेंद्र पटेल, भाजपा वसई रोड मंडळ उपाध्यक्ष वसंत शहा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अभय कक्कड, ऍड. पी. एन. ओझा उपस्थित होते. भाजपा जिल्हा महासचिव उत्तम कुमार यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

मा. आमदार हेमेंद्र मेहता यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले की, महानगरपालिकेने लावलेल्या कराविरोधात आपण राज्याचे एकमेव यशस्वी मुख्यमंत्री व विद्यमान विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घालून ह्या विषयावर त्यांचे मार्गदर्शन घेऊ. जिल्हाध्यक्ष राजन नाईक यांनी बोलताना, वेळ पडल्यास न्यायालयाचा दरवाजा ठोठाऊ पण व्यापाऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय शांत बसणार नाही.

जिल्हा महासचिव व कार्यक्रमाचे आयोजक उत्तम कुमार म्हणाले की, या कराला सर्वस्वी जबाबदार बविआ व आता ठाण्यातून चालत असलेले महाविकास आघाडी सरकार जबाबदार आहे. सन २०१९ मध्ये सत्तेत असलेल्या बविआने स्थायी समितीच्या सभा ठराव ८२ मध्ये दि. ११/७/२०१९ रोजी मंजूर करून घेतला होता. यावेळी बविआचे उमेश नाईक यांनी सूचक केले होते तर कल्पेश नारायण मानकर यांनी अनुमोदन केले होते. त्यामुळे आता बविआने 'मी नाही त्यातली...' यातले नौटंकी धंदे बंद करावे असा सज्जड टोला यावेळी त्यांनी बविआला ... पान ६ वर

# वसईतील सेवाभावी संस्थेतील महिलांचा बहुजन समाज पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

**वसई/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात बहुजन समाज पार्टीचे वेगाने काम सुरू आहे. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीत बहुजन समाज पार्टीच्या उमेदवारांनी चांगलीच कामगिरी केली. त्यामुळे याता येऊ घातलेल्या वसई-विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीतही बहुजन समाज पार्टी सर्वच प्रभागात म्हणजेच ११५ प्रभागात आपले उमेदवार उभे करणार असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिका अध्यक्ष नितीन जाधव यांनी सांगितले. त्याच अनुषंगाने मंगळवारी सेवाभावी संस्थेतील महिलांनी बहुजन समाज पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. तसेच वसई-विरार शहरात भरीव काम करण्यासाठी तसेच महिला आणि कामगारांना एकत्रित करून त्यांचे समस्या अडचणी ... पान ६ वर

# काँग्रेसचे शेतकरी प्रेम बेगडी -खा.सुधाकर श्रृंगारे

**लातूर/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच शेतकरी हिताची भुमिका मांडत शेतकर्यांना अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. शेतकरी हितासाठी करण्यात आलेले नविन कृषी कायदे भविष्यात शेती व शेतकर्यांसाठी अतिशय लाभदायी ठरणार आहेत. मात्र हे कायदे शेतकरी विरोधी असल्याचे सांगत काँगेसने राजकारण सुरु केलेले आहे. वर्षानुवर्ष सत्ता उपभोगलेल्या काँग्रेसने शेतकर्यांसाठी काय ठोस योजना केल्या ते आधी सांगावे आणि नंतरच या कायद्याला विरोध करावा असे सांगत खा. सुधाकर श्रृंगारे यांनी काँग्रेसचे शेतकरी प्रेम बेगडी असल्याचा आरोप केला.

माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीचे औचित्य साधून देशातील ९ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी २ हजार रुपये प्रमाणे १८ हजार कोटी रुपयांच्या शेतकरी सन्मान निधीच्या वितरणाचा शुभारंभ ऑनलाईन पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केला. या ऑनलाईन कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधान मोदींनी देशभरातील शेतकऱ्यांशी संवादही साधला. यासाठी लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने मार्केट यार्ड येथील शिवनेरी गेटसमोर स्क्रिन लाऊन व्यवस्था करण्यात आलेली होती. ... पान ६ वर

# आ.रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते श्रीमद् भगवतगीतेचे ग्रंथ वाटप!

**लातूर/प्रतिनिधी**

देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयीजी यांची जयंती जिल्हा भाजपाच्या वतीने साजरा करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी स्व. अटलजींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. त्याचबरोबर गिता जयंती निमीत्त श्रीमद् भगवतगीता या पवित्र ग्रंथाचे वाटप करण्यात आले. भारतीय जनता पार्टी लातूर जिल्हाच्या वतीने माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती २५ डिसेंबर २०२० रोजी जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. याप्रसंगी स्व. अटलजींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर ... पान ६ वर

# जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी -डॉ. अनिल थोरात

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात स्त्री भ्रूण हत्या टाळून लिंग गुणोत्तराच्या प्रमाणातील दरी कमी करण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची सुचना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल थोरात यांनी संबंधित यंत्रणेला बुधवारी २३ डिसेंबर रोजी केली. पंचायत समिती हॉल पालघर येथे २३ डिसेंबर रोजी पीसीपीएनडीटी व एमटीपी कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डॉ.अनिल थोरात व डॉ.राजेंद्र केळकर होते त्यावेळी सल्लागार समितीचे सदस्य डॉ.पोसम, डॉ. नारायणकर, श्रीम.वैराळे, तसेच वैद्यकिय अधिक्षक डॉ.मराड, डॉ हेंगणे, डॉ.शंतनु, डॉ.वाणी, डॉ.विश्वकर्मा आदींची उपस्थिती होती. तसेच जिल्हा कायदा सल्लागार ॲड.सीमा साठे यांनी कायद्या संदर्भातील नियम सोनोग्राफी व एमटीपी कशाप्रकारे तपासावे. रेकॉर्ड कसे जतन करावे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच सर्व उपस्थित असलेले अधिकारी यांनीही गर्भलिंग निदान व गर्भपात याबाबत मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल थोरात यांनी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत रिपोर्टींग करणे. तसेच सर्व रेकॉर्ड कायदेशीर सांभाळून ठेवणे. ... पान ६ वर